आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

६ ऑगस्ट २०११ | वर्ष २८ | अंक ९

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹ १०





## मूठभरांचे ‘मजा’सत्ताक

## सामान्यांचे ‘सजा’सत्ताक

# हे स्वातंत्र्य कुण्या प्रजासत्ताकाचे ?

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक ९ । ६ ऑगस्ट २०११

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


# अंतरंग


जागरण
**लोकपाल म्हणजे रामबाण नव्हे**
श्रीकृष्ण उमरीकर ........ ३

प्रासंगिक
**अण्णांचे आंदोलन व्यर्थ आहे**
मूळ लेखिका : तवलिन सिंह/अनु.: शेतकरी संघटक ब्युरो ........ ६

व्यक्तिविशेष
**अशोक गुलाटी : द्रष्टा शेती अर्थशास्त्रज्ञ**
अजित नरदे ........ ७

आजकाल
**'स्वातंत्र्य का नासले?' पुस्तकाविषयी**
ज्ञानेश्वर शेलार ........ १२

कॉमन नॉन सेन्स
**राज ठाकरे उत्तर द्या! या अभागी शेतकऱ्यांनी जायचे कोठे?**
सुधाकर जाधव ........ १४

मधोमध
**भारतीय जनता पार्टी (काँग्रेस गट)**
**अर्थात 'पार्टी विथ डिफ्रन्सेस'**
दत्ता जोशी ........ १६

वाङ्मय शेती
**भोंडला, हादगा आणि भुलाबाईची गाणी : उत्तरार्ध**
गंगाधर मुटे ........ १९

भारत की जुबानी
**आरक्षण और अस्मिता**
ॲड. दिनेश शर्मा ........ २२

(उ)संतवाणी
**असला कापूस नकोच लावूस**
'थंडा' महाराज देगलूरकर ........ २५

**शेतकरी संघटना वृत्त** ........ २८

# हे स्वातंत्र्य कुण्या प्रजासत्ताकाचे?

## मूठभरांचे ‘मजा’सत्ताक । सामान्यांचे ‘सजा’सत्ताक

१४ ऑगस्ट १९४७ ला मध्यरात्री १२ वाजता लाल किल्ल्यावर तिरंगा ध्वज फडकला. आपल्या देशात प्रत्यक्ष घटना लागू झाली ती २६ जानेवारी १९५० ला. तेव्हापासून आपण प्रजासत्ताक झालो. १५ ऑगस्ट २०११ च्या पार्श्वभूमीवर असं विचारावंसं वाटतं, ‘हे कुणाचे प्रजासत्ताक आहे?’ एकमय राष्ट्र या अर्थाने नेशन कुठे अस्तित्वात आहे असा प्रश्न महात्मा फुले यांनी विचारला होता. त्याच पातळीवर आज कुणाचे प्रजासत्ताक हे विचारावं वाटतं आहे. देशाची वाटणी ४ रंगांमध्ये झालेली स्वच्छपणे दिसते आहे. आपल्या तिरंग्यातले रंग घेऊनच याचं विश्लेषण करता येईल.

**हिरवा रंग :** मातीतील पोषक द्रव्ये घेऊन झाडाला हिरवेपण प्राप्त होते. त्याचप्रमाणे देशातही मूठभर राजकीय नेते, सरकारी नोकरशहा, त्यांच्याभोवतीचे लाभार्थी, उद्योगपती, व्यापारी, ठेकेदार, दलाल आदींनी या देशाचं पुरेपूर शोषण करून घेतलं आणि स्वत:ला समृद्धी मिळवून घेतली. प्रत्यक्ष देशाच्या प्रति कर्तव्य करायची वेळ आली, की आजही हे लोक कचरतात. सगळे नियम कायदे हवे तसे मोडून, वाकवून आपल्या सोयीने सगळी व्यवस्था यांनी करून घेतली आहे. स्वीस बँकेतल्या काळ्या पैशांबाबत जी चर्चा चालते तो सगळा पैसा याच वर्गाचा आहे. हे लोक नेहमीच सर्वसामान्यांचा कळवळा दाखवतात आणि प्रत्यक्षात कृती करत असताना सर्वसामान्यांचं शोषण केल्यावाचून राहत नाहीत. आजही हजारो कोटींचे गैरव्यवहार इतक्या सहजपणे घडत आहेत, की जणू काही या लोकांनी देशच विकायला काढला आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे तथाकथित सर्व राजकीय पक्ष समाजातील बहुतांश धुरीण यांमध्ये सारखेच दोषी आहेत.

**पांढरा रंग :** अख्ख्या अमेरिकेची लोकसंख्या जितकी आहे. तितका जवळपास भारतात उच्चवर्ग, उच्च मध्यमवर्ग, मध्यम वर्ग आहे. संख्येने हा वर्ग कमी असला तरी याची ताकद प्रचंड आहे. हा वर्ग कधीही स्वत: भ्रष्टाचार करत नाही; पण हे नेहमीच भ्रष्टाचाराला साथ देत आले आहेत. त्याचे मूक साक्षीदार राहिलेले आहेत. तसेच त्याचे अप्रत्यक्षरीत्या लाभार्थीही आहेत. अगदी पैशांच्या स्वरूपातला भ्रष्टाचार सोडा; पण साधी गॅस सिलेंडरची बाब विचारात घेतली तरी पन्नास लाखांचा फ्लॅट खरेदी करणारा या वर्गातला माणूस गरिबांसाठी असलेली गॅसवरची सबसिडी तशीच राहावी म्हणून आग्रही असतो. कमकुवत आर्थिक गटासाठी शासनाच्या गृहनिर्माण योजना बहुतांश याच वर्गाने गिळंकृत केल्या आहेत. पेट्रोलचा सगळ्यात जास्त वापर हाच वर्ग करतो; परिणामी पेट्रोलमधली दरवाढ यांच्याच क्षोभाला कारणीभूत ठरते. एकीकडे २०० रुपयांचं सिनेमाचं तिकीट काढताना ३५० रुपयांचं गॅस सिलेंडर महाग आहे म्हणण्याची यांना लाजही वाटत नाही. यांची मुलं चुकूनही जिल्हा परिषद अथवा महानगर पालिकांच्या शाळांमध्ये शिकत नाहीत, तर ती खासगी शाळांमध्ये शिकतात. ज्या शाळांना शासनानं अनुदान दिलेलं असतं. बोटावर मोजता येतील इतक्या शाळा विनाअनुदानित आहेत, त्यांनाही अनुदान द्यावं असा आग्रह याच वर्गाने धरलेला असून राज्यकर्त्यांना कायम विनाअनुदानित यातील ‘कायम’ हा शब्द काढायला लावला आहे. हिरव्या गटातल्या लोकांशी यांचे हितसंबंध पूर्णपणे अडकलेले आहेत. सर्वसामान्य म्हणवणारे हे लोक अण्णा हजारेंच्या आंदोलनात मेणबत्त्या घेऊन सहभागी होतात; पण हे कधीही शेतकरी, गिरणी कामगार, आदिवासी यांच्यासाठी रस्त्यावर उतरून मोर्चा काढत नाहीत.

**भगवा रंग :** हिंदू संस्कृतीमध्ये भगवा रंग हा त्यागाचं प्रतिक आहे. भारतातल्या तमाम गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी वर्गाने आतापर्यंत किमान सूखसुविधांचा त्यागच केलेला आहे. तळागाळातल्या वर्गांचं तर काही विचारायलाच नको. शिवाय आपली संस्कृतीही त्यागच आपल्याला शिकवते आणि ही संस्कृती टिकवण्याचं ओझं पूर्णपणे याच वर्गावर लादल्या गेलेलं आहे, परिणामी या वर्गाला भगवा रंग या कप्प्यात टाकणं योग्य होईल.

**निळा रंग :** प्रशासकीय यंत्रणा नावाची एक निगरगट्ट संवेदनाहीन अशी व्यवस्था आम्ही तयार केलेली आहे. झेंड्यावरती निळं अशोक चक्र असावं तशी ही व्यवस्था आपला निळा शिक्का या देशाच्या सगळ्याच घटकांवर करकरीतपणे उमटवून उभी राहिलेली दिसते. हिला कुणाशीही देणं घेणं नाही. ज्या हिरव्या घटकाशी तिचे हितसंबंध अडकलेले असतात तिच्यावरही प्रसंगी उलटायला ती कमी करत नाही. पदावरून उतरलेला एखादा मंत्री अथवा आमदार, खासदार समोरून गेला तर एरवी सलामीसाठी झुकणाऱ्याची पापणीही हलत नाही.



१९९१ पासून आपण नवीन अर्थव्यवस्थेचे धोरण अवलंबायला सुरुवात केली त्यालाही आता २० वर्षे उलटून गेली. आपली जी पारंपरिक मानसिकता होती, ज्या अडचणी होत्या, त्यावर शोधण्यासाठीचे जे उपाय होते, जी धडपड होती ते सगळं आता केव्हाच बदलून गेलंय. जागतिक पातळीवर युद्धखोरी आणि बढाईची भाषा करणाऱ्या अमेरिकेचे हातसुद्धा प्रचंड मोठ्या कर्जाखाली दबलेले आहेत. यातच सर्व काही आलंय. आपल्याला आता खूप वेगळ्या पद्धतीने विचारा करावा लागेल. या आव्हानांना तोंड देण्यासाठी नवीन काळाला सुसंगत अशी नीती आखावी लागेल तरच आपल्या स्वातंत्र्याचा खरा अर्थ आपल्याला गवसेल, अन्यथा स्वातंत्र्य दिवस म्हणजे लाल किल्ल्यावर झेंडा या पलीकडे काहीही सांगता येणार नाही.

# लोकपाल म्हणजे रामबाण नव्हे!


इंटरनेटवरून साभार

## आधी देशाचे आरोग्य सांभाळा
## शव तपासणी कोणी करावी ते नंतर पाहू

'पहिले आरोग्य सांभाळा, शव तपासणी कोणी करावी ते नंतर पाहू!' लोकपाल बिलावरून उठलेला गदारोळ पाहून हेच म्हणावे वाटते. लोकपाल विधेयक आण्णांचे काय किंवा सरकारचे काय त्यात चर्चा केवळ भ्रष्टाचाराची चौकशी कोणी करावी, कशाची करावी इत्यादींचीच आहे. मुळात भ्रष्टाचार रोखण्यासाठी काय करता येईल याविषयी कोणी काहीच बोलत नाही. नाही म्हणायला अण्णांच्या मसुद्यात एका परिच्छेदामधे सरकारी अधिकाऱ्यांनी कोणत्या खाजगी नोकऱ्या करू नयेत तसेच सरकारी निविदा वगैरे कशा पद्धतीने दिल्या जाव्यात याचा ओझरता उल्लेख आहे. बस्स तेवढेच. एरवी सर्वजण मग ते नेहमी बडबड करणारे राजकारणी असो वा उपोषण करणारे 'सिव्हिल सोसायटीचे' सदस्य असो वा चौकाचौकात दिवाळीच्या उत्साहाला लाजवणाऱ्या उत्साहाने मेणबत्त्या जाळणारे सामान्य नागरिक असो याच भ्रमात असल्यासारखे दिसतात की, एकदा लोकपाल विधेयक मंजूर झाले की भ्रष्टाचाराचा कॅन्सर कायमचा दूर होईल. भ्रष्टाचार होऊ नये किंवा कमी व्हावा यासाठी व्यवस्थेमधे जे मूलभूत बदल व्हायला हवेत याबद्दल कोणीच विचार करत नाही हे पाहून खेद होतो. आणि म्हणूनच लोकपालासंबंधी सुरू असलेला तमाशा पाहून असे वाटते की ही सगळी धडपड शवाची उत्तरीय तपासणी कोणी करावी, कशी करावी यासाठी चालली आहे. मूळात कोणी आजारी पडणार नाही किंवा आजारी पडल्यास निदान मरणार नाही यासाठी काय करता येईल याची चिंता कोणीच करत नाही! शरद जोशींनी आपल्या लेखात निवडणूक पद्धतीमध्ये करावयाच्या बदलांसंबंधी लिहिले आहे. त्यांनी प्रशासनात करावयाच्या सुधारणांविषयीही लिहिले आहे. त्यांच्या समकालीन इतर कोणत्याही नेत्याने एवढा क्रांतिकारी विचार मांडल्याचे माझ्यातरी पाहण्यात नाही.

**निवडणुका आणि त्यातला भ्रष्टाचार**

निवडणुकांच्या निमित्ताने होणारा भ्रष्टाचार आपल्या चांगल्याच परिचयाचा आहे. एखाद्या पक्षाचे तिकीट मिळावे म्हणून राजकारणी मंडळी मोर्चेबांधणी-शक्ती प्रदर्शन करतात. कोणी आपली उमेदवारी जाहीर करण्याचे पैसे घेतो तर कोणी ती मागे घेण्यासाठी पैसे घेतो. प्रचारासाठी, मतांसाठी वैध-अवैध मार्गांनी पैसा उभा केला जातो-खर्च केला जातो. ही सगळी गुंतवणूक काही आपल्याला समाजसेवेची एक संधी मिळावी म्हणून कोणी करत नाही हे उघड आहे. हेही उघड आहे की कित्येक पटीत परतावा देऊ शकणाऱ्या एका अवैध व्यवसायात केलेली ही गुंतवणूक आहे केवळ. हेही दिसतेच आहे की लोकशाही लढणाऱ्या एकाही पक्षात अंतर्गत लोकशाही नाही! त्यामुळे संघटनात्मक नेमणुका, उमेदवारी इत्यादींसाठी केवळ मते खेचण्याची क्षमता, जी नेहमी पैसे खर्च करण्याच्या क्षमतेशी निगडीत असते, हाच एक निकष ठरतो निवडीचा. या शिवाय आपल्याच पक्षाचा पण डोईजड होणाऱ्या उमेदवाराच्या पाडावासाठी विरोधी पक्षाच्या उमेदवाराला बळ देण्याचे सुरस किस्सेही आपण नेहमी ऐकतो. हे सगळे का होते? कारण निवडणूक लढणाऱ्याला ती वाट्टेल ते करून जिंकायची असते. निवडणूक कशासाठी जिंकायची? तर जिंकल्यावर मिळणाऱ्या अमर्याद सत्तेसाठी आणि त्यासाठीच हा सगळा उपद्व्याप, भ्रष्टाचारासह करण्यास सारे उतावळे असतात!

**लोकप्रतिनिधींचा भ्रष्टाचार**

लोकप्रतिनिधी, मग ते लोकसभेसारख्या सर्वोच्च संस्थेचे असो वा एखाद्या खेड्यातल्या सहकारी पतसंस्थेचे, आपल्या 'जहागिरीचे राजेच' असल्यासारखे वागतात. सत्ता मिळाल्यावर अनेक गैरमार्गांचा अवलंब करून भ्रष्टाचार करणे हाच त्यांचा एकमेव

उद्देश असतो. आपण केलेल्या 'गुंतवणुकीवर' जास्तीत जास्त 'परतावा' कसा मिळेल हेच प्रत्येक जण पाहत असतो आणि म्हणून स्वच्छ चारित्र्याच्या नागरिकांनी राजकारणात उतरावे म्हणजे भ्रष्टाचार कमी होईल, ही आशा भाबडी ठरते कारण जिवाचा कितीही आटापिटा केला तरी स्वच्छ चारित्र्याच्या नागरिकांना निवडणुका जिंकणे शक्य नाही हे आपण या आधी पाहिले आहे. गांधीनगरमध्ये अडवाणींविरुध्द टी. एन. शेषन निवडणूक हरले होते. पुण्यातून अविनाश धर्माधिकारी हरले, मुदखेडमध्ये शरद जोशी हरले. यांचे प्रतिस्पर्धी त्यांच्यापेक्षा चांगले नक्कीच नव्हते; पण राजकारणाचे-निवडणुकांचे गणित चांगुलपणावर अवलंबून नसते हे स्पष्ट आहे.

या पार्श्वभूमीवर जर लोकप्रतिनिधींच्या कामातून भ्रष्टाचार मिटवायचा असला तर त्यात त्यांच्या कामाचे प्रगतीपुस्तक लोकांसमोर आणणे गरजेचे आहे. म्हणजे आपले हे प्रतिनिधी सभागृहात किती काळ उपस्थित होते? त्यांनी कोणत्या चर्चेत भाग घेतला? कोणती मते मांडली? इत्यादी माहिती 'कोणताही अर्ज' सरकारकडे न भरता इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध व्हावी. त्याच सोबत त्यांनी घेतलेल्या तसेच 'प्रभावित केलेल्या' सर्व निर्णयांची माहिती उपलब्ध व्हावी.

आमदार-खासदारांच्या सवलती बंद करण्यात याव्यात. त्यांच्यावर बराच अनावश्यक खर्च होत असतो. त्यांचा 'निधी' बंद करण्यात यावा. राजकीय नेते प्रशासनाला आपल्या सोयीचे निर्णय घ्यायला भाग पाडत असतात. अशावेळी पुढे दिलेली 'अर्ज दाखल पद्धती' अंमलात आणल्या गेली तर मोठा फरक पडू शकेल कारण एखाद्या आमदाराने फोन केला म्हणून वाट्टेल तो निर्णय घेण्यास लालची सरकारी अधिकारी तयार असतात, कारण असे का केले हे पुन्हा कोणीही विचारत नाही.

**मंत्री-अधिकारी यांचे अधिकार**

भ्रष्टाचाराला वाव देणारे दुसरे कारण म्हणजे मंत्री-अधिकारी यांच्या हाती असलेले अमर्याद अधिकार. बरे अधिकार हाती देणे आवश्यक आहे पण जबाबदारी? ती कोणाचीच नसते! या जबाबदारीहीन अधिकारांमुळेच आदर्शसारखे प्रकरण घडले. जमीन कोणाची? ती दुसऱ्याला दिली कोणी? इमारत कोणासाठी? तीत घुसले कोण? हे सगळे कोणी केले? त्याची जबाबदारी कोणाची? असे कित्येक प्रश्न अनुत्तरीत राहणार आहेत. जर या सगळ्या प्रक्रीयेत पारदर्शकपणा असता, जर सरकारने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला असता तर हा घोटाळा टाळता आला असता. निदान झाला असता तरीही त्याची जबाबदारी कोणाची हे तात्काळ स्पष्ट झाले असते. ते कसे ते पाहू.

**सरकारकडे केलेले अर्ज**

आयसीआयसीआय बँकेच्या काही शाखांत पैसे भरण्यासाठी ते एका विशिष्ट पाकिटात बंद करून बँकेच्या आधकायाच्या हाती देण्याची सोय आहे. सदर अधिकारी ते पाकीट नंतर उघडतो आणि त्यातील पैसे पाकिटावर दिलेल्या विवरणाप्रमाणे आहे का नाही ते तपासून खात्यात जमा करतो. सदर सेवेबाबत ग्राहक समाधानी आहे. मी स्वत १-२ वेळेस तिचा लाभ घेतला. माझा अनूभव चांगलाच आहे. ग्राहकाने पाकीट दिल्यापासून त्यातील पैसे मोजून पाहण्यापर्यंत सर्व कार्य कॅमेऱ्याच्या पहाऱ्यात चालते. कोणतीही फसवाफसवी न होता सगळा व्यवहार पार पडतो. याच धर्तीवर सरकारकडे करावयाचे विनंती अर्ज स्वीकारण्यासाठी कॅमेऱ्याची नजर असलेली केंद्रे सुरू करता येऊ शकतात. या केंद्रात स्वीकारलेले अर्ज संबंधीत कार्यालयाला संगणकाच्या माध्यमातून पाठविले जाऊ शकतात. अधिकाऱ्याकडे अर्ज गेल्यावर त्याने ठराविक मुदतीत त्यावर आपली नोंद करून तो अर्ज निकाली काढावा. अर्जदाराला आपल्या कामाची प्रगती पाहण्यासाठी संगणकाच्याच माध्यमातून सोय करून देण्यात येऊ शकते.

सर्वसामान्यपणे आपण सरकारी कार्यालयात जेव्हा एखादा अर्ज देण्यास जातो तेव्हा कार्यालयातील 'अनुपस्थित' कर्मचारी-अधिकारी यांच्यामुळे तर कधी 'फाईल सापडत नाही' यासारख्या फुटकळ कारणामुळे आपल्याला त्रास सहन करावा लागतो. जर दलालांच्या माध्यमातून काम केले तर तेच काम विनाविलंब पार पडते. आपल्याला वेळ कमी असल्यामुळे आपण नाईलाजाने दलालांचे पाय पकडतो.

जर सरकारला करावयाच्या अर्जांसाठीवरील प्रमाणे केंद्रे सुरू करण्यात आली तर २४ तास ती चालू राहू शकतात. तसेच कोणताही नागरिक कोणत्याही गावातून कोणत्याही कार्यालयात आपला अर्ज पाठवू शकतो. प्रत्येक तालूक्यात असे केंद्र उभे करणे शक्य आहे. केलेल्या अर्जासोबत कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत याविषयी माहिती संगणकावरच उपलब्ध करून देता येईल. तसेच अर्ज 'पूर्ण' आहे का नाही ते चटकन समजू शकेल कारण दिलेला अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे स्वीकारण्याची सर्व प्रक्रिया कॅमेऱ्यामध्ये कैद असेल!

स्वीकारलेल्या अर्जाचे संगणकीकरण करून तो संबंधित कार्यालयाला पाठवण्याचे काम सदर केंद्र करेल. आपल्याकडे आलेल्या अर्जावर ठराविक कालावधीत योग्य तो निर्णय देण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यावर राहील. तसेच कोणाचा अर्ज कधी आला? त्यावर निर्णय कधी झाला? हे सहज तपासता येऊ शकेल. आधी आलेल्या अर्जांना डवलून मागाहून आलेल्या एखाद्या अर्जावर निर्णय घेणे शक्य होणार नाही. तसे केल्यास संबंधित अधिकाऱ्याला त्याचे उत्तर द्यावे लागेल. तसेच एखादा अर्ज नाकारताना वा स्वीकारताना त्यावर नोंदी करताना पुन्हा संगणक आणि तंत्रज्ञानाचा वापर केल्यास नोंद कोणी केली? कधी केली? काय केली? हे पाहता येऊ शकेल. चुकीच्या नोंदींची जबाबदारी ती करणाऱ्या अधिकाऱ्यावर टाकता येऊ शकेल. त्यामुळे 'आमदार साहेबांनी सांगितले म्हणून मी तसे केले' हे सांगण्याची पळवाट कोणाच्या हाती राहणार नाही. आपोआपच प्रशासनात राजकारण्यांची ढवळाढवळ कमी होईल. कदाचीत मग भ्रष्ट राजकारण्यांना राजकारणातच 'रस' उरणार नाही. तसेच मिळालेल्या अधिकारांचा निर्धास्तपणे गैरवापर करून भ्रष्टाचार करता येत नसेल तर 'सरकारी नोकरी' मिळवण्यासाठी वाट्टेल ते करण्याची मानसकताही बदलेल. भ्रष्टमार्गांचा अवलंब करून नोकरी मिळवणाऱ्यांपेक्षा जे पात्र आहेत तेच नोकरीत जातील आणि हळूहळू व्यवस्था सुधारण्याच्या मार्गावर जाऊ शकेल.

नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून सरकारी कार्यालयातील लालफितशाही आणि सोबत भ्रष्टाचार कसा कमी करता येऊ शकतो याचे हे एक उदाहरण आहे. प्रामाणिक प्रशासकीय अधिकारी आणि बुध्दीमान संगणक तज्ज्ञ एकत्र आल्यास उत्तम उपाय सापडण्यास वेळ लागणार नाही.

शिधा पत्रिका मिळवण्यासाठी केलेला

अर्ज किंवा शाळा उघडण्यासाठी दिलेला प्रस्ताव इतकेच काय तर घर बांधणीची परवानगी मागणारा अर्ज यांसारखे कित्येक अर्ज लवकर निकाली काढता येऊ शकतात. त्यासाठी कोणी हात पसरणार नाही, लाच मागणार नाही कारण सबळ कारण नसताना जर अर्ज निकाली नाही निघाला तर त्याची जबाबदारी सदर अधिकाऱ्यावर टाकता येऊ शकते. वर नमूद केल्याप्रमाणे अधिकाऱ्यांची कार्यक्षमता पारखायचा हा एक उत्तम मार्ग होऊ शकतो. प्रचलित पद्धतींमध्ये सरकार दरबारी सर्वांनाच समयबद्ध पदोन्नती मिळत असते. कामाचे योग्य मूल्यमापन झाल्यास जास्त कार्यक्षम अधिकाऱ्यांना लवकर पदोन्नती देण्याचा मार्ग सूकर होईल.

जनतेची सेवा करणे हे जर प्रशासनाचे एक उद्दीष्ट असेल तर वरील प्रणालीस कोणी विरोध करण्याची गरज नाही. या उलट पळवाटा शोधून कमाईची कुरणे तयार करू पाहणाऱ्या अधिकाऱ्यांना मात्र ही किंवा अशी कोणतीही कल्पना रूचणार-पटणार नाही.

**सरकारी नोकऱ्या-बदल्या-नियुक्त्या**

तुला अमृत हवे का सरकारी नोकरी असे विचारल्यास बहुतांश जनता सरकारी नोकरीची निवड करेल! एवढे तिचे महत्त्व आहे. म्हणून ती मिळवण्यासाठी प्रचंड आर्थिक व्यवहार होतात. नोकर भरतीचे प्रक्रिया पारदर्शक करण्यात आली तर त्यातला भ्रष्टाचार बराच कमी करता येऊ शकतो. त्याच सोबत बदल्या करताना जर 'सोडत' पद्धतीचा अवलंब केल्यास बराचसा भ्रष्टाचार कमी करता येईल.

**पोलिस खाते**

पोलिसांच्या भ्रष्टाचाराबद्दल काय सांगावे? किती सांगावे? प्रत्येकानेच पोलिस ठाण्याचा वाईट अनुभव घेतलेला असतो. ज्याला आला नाही तो नशीबवान! सामान्य नागरिक जेव्हा एखादी तक्रार नोंदवायला जातो तेव्हा पोलिस ती नोंदवून घ्यायला टाळाटाळ करतात असा अनुभव सार्वत्रिक आहे. जर पोलिस ठाण्यात कॅमेरे बसवून तक्रार नोंदवायला आलेल्या नागरिकांचे चित्रिकरण करण्यात आले आणि ते एखाद्या सर्वरमध्ये साठविण्यात आले तर पोलिसांना टाळाटाळ करता येणार नाही. कारण त्याचे चित्रीकरण होणार आहे. त्याच



सोबत सामान्य जनतेस ऑनलाईन किंवा एसएमएसच्या माध्यमातूनही तक्रार नोंदवण्याची सोय करून देणे गरजेचे आहे. अशा तक्रारींची नोंद संगणकात होत असल्यामुळे ती केव्हा केली? कोणी केली? कोणत्या मोबाईलवरून एसएमएस आला? कोणत्या संगणकावरून ईमेल आला? हे सहज शोधता येते. असे जर झाले तर तक्रारींचे प्रमाण खूप वाढेल. त्यामुळे पोलिसांवरील ताणही वाढेल; पण त्यासाठी सरकारने योग्य ती पाऊले उचलावीत म्हणजे नागरिकांना निर्भय होऊन राहता येईल. आज राजकारणी-पोलिस-गुंड यांच्या अभद्र युतीमुळे सामान्य लोकांना कोणताच आधार राहिलेला नाही. उत्तरप्रदेशच्या बातम्या आपण रोज ऐकत आहोत.

**करवसुली**

सरकार जनतेवर वेगवेगळे कर लादते. त्याची वसुली करणारी यंत्रणा मोठ्या प्रमाणावर भ्रष्ट असल्यामुळे पुरेशा प्रमाणात करवसुली होत नाही असा अनुभव आहे. करप्रणाली सुलभ करून करवसुली वाढवणे गरजेचे आहे. केवळ विक्रीकराची वसुली १००% झाल्यास सरकारला इतर कोणताही कर आकारण्याची गरज वाटणार नाही! पण तसे होत नाही ते आपण पाहतो. इतरही करवसुलीमध्ये गडबड होत असते. त्यावर तज्ज्ञांनी उपाय शोधावेत.

वर काही मुद्दे दिले आहेत ज्यांविषयी लोकपाल विधेयकाच्या नावाने गदारोळ उठवणारे लोक काहीच बोलत नाहीत. सामान्य जनतेच्या जीवनावर परिणाम करणारे इतरही काही घटक आहेत. त्यामध्ये प्रथम सुधारणा होणे गरजेचे आहे. जसे चांगले शिक्षण, उत्तम आरोग्य सेवा, कार्यक्षम वाहतूक व्यवस्था, पिण्यास पुरेसे पाणी इ. इ.

वर सुचविलेले बदल करणे शासनाच्या हाती आहे; पण शासन तसे काही करणार नाही, कारण शासनाचा उद्देश जनतेची 'सेवा' करणे हा नसून आपल्या तुंबड्या भरणे हा आहे. त्यात राजकारणी-अधिकारी सगळे सामील आहेत. या भस्मासूराला स्वतःच्या डोक्यावर हात कसा ठेवायला लावायचा? हाच मोठा प्रश्न आहे. भ्रष्टाचार कमी करणारा कायदा/सुधारणा जे भ्रष्टाचार करतात ते राजकारणी कसा मंजूर करतील? या अवघड प्रश्नाचे उत्तर अण्णांनी दिले. जंतरमंतरवर उपोषण करून त्यांनी शासनाला गुडघे टेकायला भाग पाडले. अण्णांच्या मागे जनतेची शक्ती उभी होती. हा लढा आणखी तीव्र करून केवळ लोकपालासाठी न लढता प्रशासकीय सुधारणांसाठी त्यांनी लढायला हवे होते जेणेकरून भ्रष्टाचाराचा समूळ नायनाट करता आला असता. देव प्रसन्न होऊन तुला काय हवे ते माग असे म्हटल्यावर 'माझ्या भाजीत मीठ कमी आहे तेवढे आणून दे' असे म्हणण्यात जो करंटेपणा आहे तोच अण्णांनी दाखवला. कारण लोकपालाच्या नेमणुकीमुळे भ्रष्टाचाराला काही प्रमाणात आळा बसू शकेल यात शंका नाही, त्यासाठी चालू असलेला लढा योग्यच आहे; पण म्हणून काय भ्रष्टाचार कमी करण्याचा कोणी विचार करू नये? आज भ्रष्टाचार एवढा वाढलेला आहे की जरी अण्णा आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पूर्ण अधिकार दिले, जे हवे ते सर्व दिले तरी येणाऱ्या सर्व तक्रारींना न्याय देणे त्यांना शक्य होणार नाही. जर सरकारचा लोकपाल आला तर भ्रष्टाचारात काहीच कमी होणार नाही आणि म्हणूनच झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी कोणी कशी करावी याची चर्चा करण्यापेक्षा तो मूळात कसा होणार नाही किंवा कसा कमी होईल हे पाहणे जरूरी आहे असे आम्हाला वाटते. त्यामुळेच लोकपाल विधेयकवरून जो गदरोळ उठला आहे तो म्हणजे शव तपासणी कोणी करावी यासाठी चाललेला वाद आहे. रोग्याचे आरोग्य कसे चांगले राहील याची चिंता कोणालाच नाहीये असे म्हणावे लागते.

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानल पेठ, परभणी-४३१४०१.
मो. ९४२२६४६२८३

■■



तवलीन सिंग

# अण्णांचे आंदोलन व्यर्थ आहे

**भ्रष्टाचाराने देशाची नीतिमत्ता आणि भविष्य संपवायला सुरुवात केली आहे. त्याविरुध्द आपण लढा दिलाच पाहिजे. ते संपवण्यासाठी काही दशकांपासून चालू असलेले समाजवादी धोरण, ज्याच्याआडून काही मोजक्या लोकांनीच आपला फायदा करून घेतला, मोडीत काढले पाहिजे. जमिनीचे अधिग्रहण असो वा खाणीतून खनिजे काढण्याचे धोरण असो वा गरिबांना मदत करण्याच्या नावाने चाललेले सरकारी कार्यक्रम असो जिथे जिथे सरकारच्या हाती कारभार आहे, जिथे जिथे सरकारी नियंत्रणे आहेत तिथे भ्रष्टाचार आहेच. मग याच सरकारी व्यवस्थेचा भाग बनू शकणाऱ्या लोकपालाच्या नेमेणुकीवरून भ्रष्टाचार कसा कमी होऊ शकतो?**

अण्णांनी जंतरमंतरवर आपले उपोषण सुरू केले तेव्हापासूनच हे सगळे व्यर्थ आहे असे मत मी व्यक्त केले होते. तसे म्हणण्याचे कारण आण्णा भ्रष्ट आहेत हे नसून आण्णांच्या 'टीम'मध्ये जी माणसे आहेत त्यांनी भारतातल्या भ्रष्टाचाराची कारणे आणि त्याची केलेली कारण मीमांसा चुकीची आहे-भ्रष्ट आहे. म्हणून अण्णांचे आंदोलन व्यर्थ आहे असे मी म्हटले होते. या बुद्धीवादी लोकांचे म्हणणे असे की भारतातल्या भ्रष्टाचाराचे मूळ उदार आर्थिक धोरणांमध्ये आहे! ते असेही म्हणतात की देशातल्या उद्योगांनी देशात माफियांचे राज्य चालवले आहे म्हणून!

देशातले उद्योग आज जगात नाव कमावत आहेत कारण लायसन्स-परमीट राज संपले म्हणून. सरकारने त्यांना काही मदत केली म्हणून नाही. फिलीपाईन्समध्ये किंवा रशियामध्ये सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीने उद्योजकांनी देशाच्या खजिन्याची जी लूट केली तिची तुलना भारतातल्या उद्योगाच्या प्रगतीशी करणे चुकीचे ठरेल.

भारतातल्या उद्योजकांमुळेच १९९१ नंतर देशाची आर्थिक प्रगती 'हिंदू ग्रोथ रेट' च्या शापातून मुक्त झाली आणि तिची घोडदौड वेगाने सुरू झाली. जेव्हा सरकारची मोजक्या उद्योजकांशी अभद्र युती होती त्या काळात म्हणजे १९९१ पूर्वी, काही मोजक्याच उद्योजकांचा फायदा होईल अशाप्रकारे सरकारी धोरणे असत. हा फायद्यात लायसन्स-परमीट देणारे अधिकारी-राजकारणी यांनाही वाटा मिळत असे. जेव्हा या लायसन्स-परमीटच्या जाचक बंधनातून भारतीय उद्योगाची सुटका झाली तेव्हा देशातल्या उद्योगांनी उत्तुंग भरारी घेतली ज्याचे सारे जग कौतुक करत आहे. सर्व भारतीयांना याचा अभिमान वाटला पाहिजे; पण सर्वांना तसा तो वाटत नाही कारण त्यांच्या डोक्यात 'समाजवादाचे खूळ' ठासून भरलेले आहे.

देशातल्या सगळ्या भ्रष्टाचाराला सरकार कारणीभूत आहेच (ग्लोबल फायनांशियल इंटिग्रिटी या संस्थेने आपल्या अहवालात असे सांगितल्याचे आपल्याला आठवत असेल की 'जगात भारत हा एकमेव देश असा आहे की जेथे सरकारी योजनांवर खर्च झालेल्या पैशांतून काळ्या धनाची निर्मिती होते) भ्रष्टाचाराचा हा रोग इतक्या खोलवर पोहोचला आहे की सर्वांत खालच्या पातळीवरचा सरकारी कर्मचारीसुद्धा त्याचे हात 'ओले' केल्याशिवाय काम करत नाही तेही असे काम ज्यासाठी त्याला पगार मिळत असतो! उत्तरप्रदेशात आरोग्य खात्याने केलेल्या घोटाळ्यांच्या बातम्या ऐकून आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही कारण जिथे जिथे सरकारी नियंत्रणे आहेत तिथे भ्रष्टाचार आहेच.

हा भ्रष्टाचार समूळ उखडून टाकायचा असला तर नवे कायदे/नवे विभाग सुरू करण्यापेक्षा एक पारदर्शक व्यवस्था उभी करणे जास्त परिणामकारक ठरेल; पण सरकारी अधिकारी तसे होऊ देणार नाहीत कारण तशी व्यवस्था जर उभी राहिली तर त्यांना वरची कमाई कशी मिळेल? सरकारी अधिकाऱ्यांमध्ये नीतिमत्ता औषधालाही शिल्लक राहिलेली नाही. ते एवढ्या खालच्या पातळीला पोहोचले आहेत की समाजातल्या अत्यंत दुर्बल घटकाच्या फायद्याच्या योजना राबवतानासुद्धा त्यांचा भ्रष्टाचार थांबत नाही. ग्रामीण रोजगार योजना किंवा उत्तरप्रदेशातील आरोग्य खात्यातील घोटाळ्यांतून हेच दिसून येते. भ्रष्टाचाराचा हा काळा धंदा एवढा फायदेशीर आहे की तो चालू राहावा म्हणून हे अधिकारी कोणाचा खून करण्यासही मागे-पुढे पाहणार नाहीत.

अण्णा आणि त्यांचे सहकारी उत्तरप्रदेशातील आरोग्य खात्यातील घोटाळ्याबद्दल का बोलत नाहीत? त्यांचेच एक सहकारी, जे कर्नाटाकात लोकायुक्त आहेत, ज्यांनी येडीयुरप्पांनी केलेल्या खाण-घोटाळ्याबद्दल ५००० पानी अहवाल सादर केला आहे, त्यांनी सोप्या शब्दांत हे का नाही सांगितले की जर पारदर्शक धोरणाचा अवलंब केला असता तर हा घोटाळा झालाच नसता? आज देशातील उद्योजक परदेशात गुंतवणूक करत आहेत. त्याची कारणे त्यांना विचारली तर ते सांगतील की परदेशातील धोरणे आपल्या देशातील धोरणांप्रमाणे भोंगळ नाहीत तसेच त्या देशातील अधिकाऱ्यांना लाच देऊन या धोरणात बदल करता येत नाहीत. त्यामुळे त्यांच्या गुंतवणुकीला स्थैर्य मिळते त्यावर जास्त काळ निश्चित असा परतावा मिळू शकतो.

भ्रष्टाचाराने देशाची नीतिमत्ता आणि भविष्य संपवायला सुरुवात केली आहे. त्याविरुध्द आपण लढा दिलाच पाहिजे. ते संपवण्यासाठी काही दशकांपासून चालू असलेले समाजवादी धोरण, ज्याच्याआडून काही मोजक्या लोकांनीच आपला फायदा करून घेतला, मोडीत काढले पाहिजे. जमिनीचे अधिग्रहण असो वा खाणीतून खनिजे काढण्याचे धोरण असो वा गरिबांना मदत करण्याच्या नावाने चाललेले सरकारी कार्यक्रम असो जिथे जिथे सरकारच्या हाती कारभार आहे, जिथे जिथे सरकारी नियंत्रणे आहेत तिथे भ्रष्टाचार आहेच. मग याच सरकारी व्यवस्थेचा भाग बनू शकणाऱ्या लोकपालाच्या नेमेणुकीवरून भ्रष्टाचार कसा कमी होऊ शकतो? अण्णा आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या बुद्धीवर कोणते झापड पडले आहे ज्यामुळे त्यांना हे कळत नाही?

*(तवलीन सिंह यांचा हा लेख इंग्रजी दै. इंडियन एक्स्प्रेस, २४ जुलै ११ मधून साभार अनुवादीत करण्यात आला आहे.)*

# अशोक गुलाटी : द्रष्टा शेती अर्थशास्त्रज्ञ

**[ अशोक गुलाटी यांनी गहू व भात यांच्या निर्यातबंदीला विरोध केला. गव्हाची निर्यातबंदी उठविण्याचा निर्णय कृषीमंत्री शरद पवार यांनी १६ जुलै २०११ रोजी घेतला. तेव्हा अशोक गुलाटी यांनी त्यावर अतिशय तिखट शब्दांत प्रतिक्रीया दिली. ''शेतीमालाच्या निर्याती संबंधित खूप उशिराने, अत्यंत हळू, भित्रा, अतिशय सावध निर्णय घेण्याच्या पध्दतीमुळे देशाला पुन्हा पुन्हा खूप मोठी किंमत द्यावी लागत आहे. अशा पद्धतीचे धोरण अजिबात चालणार नाही.'' शेतकऱ्यांना गव्हाला आधाराभूत किंमत न मिळाल्याची नुकसान भरपाई मिळावी म्हणून त्यांनी आग्रह धरला. साखर उद्योग आणि शेतकरी नेते यांनी अशोक गुलाटी यांच्यामध्ये आपले प्रश्न सोडवून घेण्यासाठी एक मित्र मिळाला आहे. शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्याचे शरद जोशी यांचे स्वप्न पुरे करण्यात डॉ. अशोक गुलाटी यांचा मोठा वाटा असेल, याबाबत मला शंका वाटत नाही. ]**

कमिशनर फॉर ॲग्रीकल्चरल कॉस्ट ॲंड प्रायसेस (सी.ए.सी.पी)चे अध्यक्ष डॉ. अशोक गुलाटी यांनी महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदार यांची बाजू समजावून घेण्यासाठी पुण्यात साखर संकूलमध्ये एक बैठक बोलावली होती. कृषी भवन (दिल्ली) येथे बसून विविध विभागांतून गोळा होणाऱ्या माहितीच्या आधारे उसाचा उत्पादखर्च निश्चित करण्यापेक्षा समक्ष शेतकरी नेत्यांना भेटून त्यांचे प्रश्न आणि ऊस दरासंबधी अपेक्षा जाणून घेण्यासाठी डॉ. अशोक गुलाटी आले होते.

पुण्यात प्रत्यक्षात साखर आयुक्त कार्यालयाने ही बैठक बोलावण्याचे नियोजन केले होते. साखर उद्योगातील ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, शंकरराव कोल्हे, शिवाजी गिरीधर पाटील इत्यादी मान्यवर उपस्थीत होते. तर शेतकऱ्यांच्या बाजूने शरद जोशी, संजय कोले, खा. राजू शेट्टी आणि रघुनाथ पाटील उपस्थित होते.

सदर बैठकीत प्रस्तावना करताना डॉ. अशोक गुलाटी यांनी अत्यंत विनम्रपणे विषय समजावून घेण्याची इच्छा व्यक्त केली. साखर कारखानदारांनी साखर उद्योगासमोरील प्रश्न मांडले. साखरेच्या घटत्या किमती, वाढते साठे, ऊस दराचा दबाव आणि तोडणी मजूरांचा प्रश्न वगैरे. शेतकरी नेत्यांनी अनेक कारखान्यांनी ठरलेला दरही दिला नाही, ऊस तोडणी मजूरांकडून आणि वाहतूकदारांकडून झालेला त्रास इत्यादी बाबींची चर्चा केली. शेतकरी प्रतिनिधींनी आपल्या भूमिका अत्यंत परखडपणे मांडल्या, साखर कारखानदारांनीही आपले प्रश्न मांडले; पण वातावरण तापू न देता अत्यंत संयमाने चर्चेचे नियोजन करून साखर उद्योग समजून घेण्याचा प्रयत्न डॉ. अशोक गुलाटी यांनी केला.


अजित नरदे

विषय समजून घेण्याची ही केवळ सुरुवात आहे. या पुढे अशा अनेक बैठकांचे आयोजन होणार आहे. एकाच बैठकीत सर्व बाबी स्पष्ट होतील असे नाही; पण एकूण साखर उद्योग, शेतकरी आणि ग्राहक यांच्या हिताचा विचार करून व्यवहार्य मार्ग काढण्याचा प्रयत्न असल्याचे गुलाटी यांनी स्पष्ट केले. अशा पद्धतीने देशभर फिरून लोकमत समजून घेण्याचा सी.ए.सी. पी अध्यक्षाने केलेला प्रयत्न हा निश्चितच आशादायक आहे.

ऊस शेतकऱ्यांचे प्रश्न समजावून घेताना डॉ. अशोक गुलाटी यांनी विनम्र विद्यार्थ्याची भूमिका घेतली असली तरी ते या विषयातील जाणकार विद्वान आहेत, साखर संकूलातील बैठकीच्या आदल्या दिवशी डॉ. गुलाटी यांनी शेतकरी नेते शरद जोशी यांची घरी जाऊन भेट घेतली. या संबंधात त्यांच्या भावना नंतर चर्चेत त्यांनी व्यक्त केल्या. ते त्यांच्या वैचारीक गुरूचे दर्शन घेण्यासाठीच आले होते. सी.ए.सी.पी.चे काम सुरू करताना शरद जोशींची भेट घ्यावी अशी त्यांची उत्कट



**एम.एस. स्वामीनाथन**
**नॉर्मन बोरलॉग यांच्या संशोधनाचा भारतात विस्तार करून अनेक मानसन्मान मिळवले; पण अधिक मानसन्मानासाठी जैवतंत्रज्ञान विरोधकांचे बाहुले झाले.**



**डॉ. नॉर्मन बोरलॉग**
**युरोपमधील सामर्थ्यशाली जैवतंत्रज्ञानविरोधी लॉबीला न जुमानता नॉर्मन बोरलॉग यांनी जनुक परिवर्तीत बियाण्यांचा पुरस्कार केला आणि नॉर्मन हेच खरे हरितक्रांतीचे जनक आहेत.**

इच्छा होती.

शरद जोशींनी सरकारच्या अधिकृत धोरणातून शेतीचे कसे शोषण केले जात आहे हे मांडले. त्यातून त्यांनी शेतकऱ्यांच्यात असंतोष निर्माण करून शेतकरी आंदोलनाचे वादळ उभे केले. शेतीमालाची म्हणजे जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ हीच एकमेव समस्या आहे, असे ठाम समजूत असण्याच्या काळात शरद जोशी यांनी प्रवाहाच्या विरुद्ध टक्कर देण्याची किंमत पुरेपूर मोजली. याचे भान डॉ. गुलाटी यांना आहे. डॉ. अशोक गुलाटी हे अर्थशास्त्रामधील शरद जोशी आहेत.

डॉ. अशोक गुलाटी यांनी गेली कित्येक वर्षे अतिशय शिस्तबद्धरीतीने शेतीमालाच्या बाजारपेठेवर नियंत्रण आणि निर्बंध आणून शेतकऱ्यांची लूट होत असल्याचे स्पष्ट केले. शरद जोशी शेतकऱ्यांच्यात फिरून संघटन करून चळवळ करीत होते. तर डॉ. अशोक गुलाटी अर्थशास्त्रज्ञांच्यात राहून शेतकऱ्यांची बाजू मांडत होते डॉ. गुलाटी अतिशय संयमाने, तरीही ठामपणाने, पुरावे सादर करून शेतकऱ्यांची बाजू मांडत होते.

आज शेतकऱ्यांच्या बाजूने मगरीचे अश्रू ढाळण्याची फॅशन झाली आहे. शेतातील काही न समजणारेही शेतकऱ्यांच्या बाजूने गळा काढतात. नंतर महागाईविरुद्धच्या मोर्चातही सहभागी होतात; पण सर्व विचारवंत व नेते विरोधात असताना शरद जोशी आणि अशोक गुलाटी यांनी एकाकी लढा दिला आहे. यामुळेच आज शेतकऱ्यांच्यावर अन्याय होतो हे मान्य करणे विरोधकांना भाग पडले आहे.

शरद जोशी आणि अशोक गुलाटी यांच्यात आणखी एक समान धागा आहे. दोघेही खुल्या, मुक्त अर्थव्यवस्थेचे समर्थक आहेत. खुल्या बाजारपेठेचा योग्य रीत्या उपयोग करून शेतकऱ्यांना न्याय देता येतो असे त्यांना वाटते. शेतकऱ्यांना बाजारपेठेचे स्वातंत्र्य मिळाले तर त्यांना अधिक न्याय मिळेल असे त्यांना वाटते. त्यामुळे अनेक तथाकथित शेतकरी नेते, डावे विचारवंत खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरणाला विरोध करीत होते तेव्हा हे दोघे त्याचे जाहीर समर्थन करीत होते. बाजारपेठ खुली झाली की शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न अपोआप सुटतील अशी त्यांची अपेक्षा नव्हती. तर खुल्या बाजारपेठेतील

# शेतीमालाच्या निर्यात बंदीबाबत गुलाटी यांची तीव्र नाराजी

यंदा गव्हाचे विक्रमी उत्पादन येणार हे अपेक्षित असतानाही केंद्र सरकारने गव्हाच्या निर्यातीवर असलेली बंदी उठवली नाही. या संबंधात वारंवार शेतकऱ्यांनी मागणी केली तरी बंदी उठवण्यास टाळाटाळ केली. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गव्हाला चांगले भाव होते तोपर्यंत निर्यात बंदी उठवली गेली नाही. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील दर उतरू लागताच निर्यातबंदी उठवली गेली.

जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात कृषीमंत्री शरद पवार यांनी गव्हाच्या निर्यातीवरील बंदी उठविण्याची घोषणा केली. यावर १५ जुलै २०११ रोजी द इकनॉमिक टाइम्सच्या प्रतिनिधींशी बोलताना अशोक गुलाटी यांनी अतीशय तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, ''सदर निर्णय डॉलर शॉर्टचा प्रकार आहे. खूपच उशिरा निर्णय झाला आहे. शेतीमालाच्या निर्यातीसंबंधी अतिशय घाबरून, अतिशय हळू आणि अतिसावधपणे निर्णय घेण्याच्या पद्धतीमुळे देशाला खूप मोठी किंमत द्यावी लागत आहे. असे फार काळ चालू शकणार नाही.''

यंदा गव्हाला उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्य प्रदेशात खुल्या बाजारपेठेत किमान आधारभूत किंमतही मिळाली नाही. निर्यात बंदीमुळे गव्हाचे दर किमान आधारभूत किमतीपेक्षाही प्रती क्विंटल १०० रु. कमी होते. या संबंधात बोलताना आयोगाचे अध्यक्ष अशोक गुलाटी म्हणाले, ''उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये दुसऱ्या हरित क्रांतीची स्वप्ने केंद्र सरकार पाहत आहे. तेथील शेतकऱ्यांना हेक्टरी रु. २००० ते रु. ३००० नुकसान भरपाई दिली पाहिजे.



## अशोक गुलाटी

**अर्थशास्त्रज्ञांत शेतकऱ्यांची बाजू घेऊन सातत्याने विरोधकांना निष्प्रभ करणारा शास्त्रज्ञ**



## शरद जोशी

**शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या लढाईतील सेनापती**

कार्यक्षमतेचा, स्वातंत्र्याचा कौशल्यपूर्वक वापर करून शेती फायदेशीर, अधिक उत्पादक आणि आधुनिक करण्यावर दोघांचा विश्वास आहे.

आज शेती करणारे सर्व लोक यापुढेही पिढ्यान्‌पिढ्या शेतीच करीत राहतील असे या दोघांना वाटत नाही. नव्या तंत्रज्ञानामुळे शेतीत खूप मोठे बदल होणार आहेत. अधिक उत्पादकता असलेली शेती खूप कमी लोकांना करता येणार आहे. शेतीतून मोठ्या संख्येने लोकांना इतर उत्पादन व्यवस्थेत स्थलांतर करावे लागणार आहे, असे होणे हे इष्ट आहे, असेच त्यांचे मत आहे. त्यामुळे शेती सोडून जाणारे, शेती विकणाऱ्या शेतकऱ्यांच्याकडे पाहून ते उगाच हळवे होत नाहीत.

शेतकरी अन्नदाता आहे. शेती हाच त्यांचा धर्म आहे. त्यांनी पिढ्यान्‌पिढ्या शेतीच करावी असे त्यांना वाटत नाही. अशोक गुलाटी म्हणतात, ''शेतकरी हा शेती उद्योजक आहे. त्याला उत्पादनापेक्षा नफा वाढवण्यामध्ये जादा रस आहे.'' शेतकरी इतर उद्योजकांप्रमाणे नफ्यासाठीच काम करतो. इतर उद्योजकांना मिळणारे स्वांतत्र्य शेतकऱ्यांनाही मिळाले पाहीजे, या बाबतीत ते ठाम आहेत.

त्यांना शेतकऱ्यांबद्दल दया, करुणा वाटत नाही; पण शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतल्यामुळे शेतकऱ्यांना द्याव्या लागणाऱ्या किमतीचे भान त्यांना आहे. ते शेतकऱ्यांच्या अकार्यक्षमतेची किंमत समाजाने द्यावी, अशी ते अपेक्षा करीत नाहीत. त्याचबरोबर शेतकरी जीवनावश्यक अन्नाचे उत्पादन करतो म्हणून त्याला शिक्षाही दिली जाऊ नये. त्याला खुल्या बाजारपेठेत मिळणारे भाव मिळू द्यावेत, याबाबतीत ते ठाम आहेत.

पारंपरिक शेती खूप छान होती, आधुनिक शेतीतंत्रानेच सर्व बिघडवले आहे. पुन्हा मागे जाऊ. संकरीत बियाणे वाईट, कीटकनाशके वाईट, जनूक परिवर्तीत बियाणे तर अतिशय वाईट, यंत्रे, औजारे वाईट असा भ्रम पसरवण्यात काही मंडळी खूपच यशस्वी झाले आहेत. यात परंपरावादी, गांधीवादी, संघवादी आणि सर्वार्थाने पराभूत झालेले डावे आहेत. या विरोधामुळे सर्वांच्या आधुनिक तंत्रज्ञानापासून भारतीय शेतकरी वंचीत राहीला आहे. शरद जोशी आणि अशोक गुलाटी दोघे या आधुनिक तंत्रज्ञानाचे समर्थक आहेत. गुजराथमधील शेतीच्या विकासाचा वेग

अन्यथा किमान आधारभूत किमतीची विश्वासार्हता राहणार नाही. या घोषणा पुढील रब्बी हंगाम सुरू होण्यापूर्वी झाल्या पाहिजे. त्या शिवाय उत्पादन वाढवण्याची प्रेरणा शेतकऱ्यांना राहणार नाही.''

अशोक गुलाटी पुढे म्हणाले, ''आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गेल्या १५ दिवसांत गव्हाच्या किमती ५० डॉलर/प्रतिटन कमी झाल्या आहेत. त्यामुळे आता गव्हाला निर्यात परवाना देण्याचा शेतकऱ्यांना कोणताही फायदा नाही. आता निर्यात परवाने निरर्थक झाले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना रास्त भाव मिळू शकत नाही. देशात सर्वात जास्त भात आंध्र प्रदेशात मिळतो. आता तेथेही किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी भावात भात विकला जात आहे.''

डाळी संबंधात बोलताना अशोक गुलाटी म्हणाले, ''देशाला डाळीची खूप मोठ्या प्रमाणात गरज आहे. देशाची गरज भागवण्यासाठी खूप मोठी किंमत देऊन डाळीची आयात केली जाते. पण आता बिहारमध्ये डाळीही आधारभूत किंमतीपेक्षा कमी भावात विकली जात आहे. याची आम्ही सी.एस.सी.पी. मार्फत चौकशी करीत आहोत. साठवणूकीची व्यवस्था नसल्याने गहू खराब होत आहे. आधारभूत किंमतीपेक्षा कमी भावाने गहू विकावा लागल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली पाहिजे.गहू व तांदळातील घटना पाहता सरकारच्या आधारभूत किंमती बद्दल कोणालाही चांगले बोलता येणार नाही. अन्न सुरक्षा कायद्यानुसार ठराविक किंमतीत अन्न पुरवता न आल्यास रोख नुकसान भरपाई देण्याचा कायदा सरकार करते. तर किमान आधारभूत किंमतीत शेतीमाल विकला गेला नाही तर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई का मिळू नये?'' असा अशोक गुलाटी यांचा प्रश्न आहे.

■

९.५ टक्के असण्याचे कारण बीटी कापसाचे बियाणे आहे असे अशोक गुलाटी म्हणतात, शेतीत सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञान मोकळेपणे येऊ देण्याबाबत ते ठाम आहेत.


सहकार, सरकार आणि समाजवाद या संबंधी दोघांनाही फारशी आस्था नाही. सहकारबाबत भोळाभाबडा आशावाद त्यांच्या मनात नाही, ही गाजराची पुंगी वाजली नाही तरी सांभाळत बसण्यात दोघांना स्वारस्य नाही. ''सहकार अयशस्वी झाला आहे पण तो यशस्वी झालाच पाहिजे'' असल्या विधानातील व्यर्थता त्यांनी जाणली आहे. म्हणून शेतकऱ्यांनी केवळ सहकारवर अवलंबून न राहता त्यांना हवे तसे व्यापारी व्यावसायीक संघटन पध्दती वापरावी, असे दोघांचे मत आहे. ते कॉर्पोरेटचा दु:स्वास करत नाहीत. बाजारपेठेवर अविश्वास दाखवत नाहीत. सरकारवर अवलंबून राहणे त्यांना पसंत नाही. शेतकऱ्यांच्या उद्योजकतेवर त्यांचा विश्वास आहे. दोघांनाही स्वातंत्र्य प्रिय आहे. तरीही परिस्थिती अनुरूप आपली मते बदलण्यास ते नेहमीच तयार असतात.


नॉर्मन बोरलॉग यांनी विकसित केलेले हरित क्रांतीचे तंत्रज्ञान भारतात आयात करून एम.एस.स्वामिनाथन हरित क्रांतीचे शिल्पकार झाले. त्याबद्दल मिळालेल्या सर्व मान-सन्मानाचा मोठ्या आनंदाने त्यांनी स्वीकार केला. अद्याप न मिळालेले मानसन्मान मिळविण्यासाठी उत्सुक आहेत. यासाठी हरित क्रांती तंत्रज्ञानास विरोध करणाऱ्या मंडळीचे अनुनय करताना ते दिसतात. त्यांची भारतरत्न आणि नोबेल पारितोषिक मिळवण्यासाठी धडपड सुरू आहे, असा संशय अनेकांना आहे; पण नोबेल मिळेल की नाही सांगता येणार नाही; पण 'भारतरत्न' ते मिळवू शकतील, असे वाटते. कारण आपल्या इथे गुणवत्तेचे सर्वच निकष सैल आहेत. बी.टी. वांग्यासंबंधी संदिग्ध भूमिका घेऊन त्यावर बंदी घालण्यात जयराम रमेश यांना त्यांनी मदत केली. जैविक तंत्रज्ञानाला विरोध करणाऱ्या लॉबीच्या तुष्टीकरणासाठी 'नरो वा कुंजरो वा' भूमिका घेतात. अशी दांभिकता ना शरद जोशींना मान्य ना अशोक गुलाटी यांना.

दि बिझनेस स्टँडर्ड या दैनिकात एम. एस. स्वामिनाथन यांची मुलाखत प्रसिध्द झाली होती. त्यात अशोक गुलाटी विदेशी कंपन्यांचे हितसंबंध सांभाळतात, असा त्यांनी आरोप केला. यासंबंधी अशोक गुलाटी यांनी स्वामीनाथन यांचेकडे खुलासा मागितला. ''मी असे विधान केले नाही. माझे तोंडी आलेले विधान खरे नाही,'' असे स्वामीनाथन त्यांना म्हणाले.

पुढे सी.ए.सी.पी.चे अध्यक्ष झाल्यानंतर बिझनेस स्टँडर्डच्या पत्रकारांनी त्यांची मुलाखत घेतली. त्यात त्यांनी यासंबंधी गुलाटी यांना प्रश्न विचारले, ''सदर विधान केल्याचे खुद्द स्वामीनाथन यांनीच नाकारले आहे,'' असे गुलाटी यांनी उत्तर दिले. तेव्हा मुलाखतकर्त्या पत्रकाराने त्यांना सांगितले, ''त्यांच्या त्या मुलाखतीची टेप आमच्याकडे आहे. त्यात त्यांनी ते विधान केलेच आहे.'' यावर गुलाटी यांनी फक्त स्मित केले.

एका बाजूला आधुनिक तंत्रज्ञान आणल्याचे श्रेय घ्यायचे. दुसऱ्या बाजुला अधिक मोठे मानसन्मान मिळवण्यास अडथळा होऊ नये म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाला विरोध करणाऱ्या झुंडींचा अनुनय करायचे ही स्वामीनाथन यांची कार्यपद्धती आहे. या उलट नॉर्मन बोरलॉग हे आधुनिक हरित क्रांती तंत्रज्ञानाचे खरे शिल्पकार. स्वामिनाथन यांचे कार्य फक्त भारतात कृषी विस्ताराचे आहे. त्यांचे कोणतेही मूलभूत संशोधनाचे योगदान नाही. डॉ. नॉर्मन बोरलॉग यांनी जैविक तंत्रज्ञानाचे जोरदार समर्थन केले. स्वामीनाथन यांच्यासारखा बोटचेपेपणा केला नाही. शरद जोशी आणि अशोक गुलाटी याच परंपरेतील आहेत.




## अशोक गुलाटी यांची पुस्तक संपदा

१. मेझ इन एशिया : चेजिंग मार्केट अँड इन्सेटिव्ह
२. लिबरलायझींग फूड मार्केटस्
३. इंस्टीट्यूशनल रिफॉर्म इन इंडियन इरिगेशन
४. अ‍ॅग्रीकल्चरल डायव्हरशीफिकेशन अँड स्मॉल होल्डरर्स इन साऊथ एशिया
५. फ्राम पॅरास्टॅटाल टू प्रायवेट ट्रेड : लेसन्स फ्राय एशियन अ‍ॅग्रीकल्चर
६. सबसीडी सिंड्रोम इन इंडियन अ‍ॅग्रीकल्चर
७. इकनॉमिक रिफार्मस् अँड फूड सेक्युरिटी
८. द ड्रॅगन अँड द एलिफंट : अ‍ॅग्रीकल्चरल अँड रूरल रिफॉर्म इन चायना अँड इंडिया
९. ऑपरेशन अँड मेंटेनन्स कॉस्ट ऑफ कॅनॉल इरिगेशन अँड देअर रिकव्हरी इन इंडिया
१०. इंस्टीट्यूशनल रिफॉर्मस् फॉर बेटर कॉस्ट रिकव्हरी अँड इफिसियन्सी इन इंडियन कॅनॉल इरिगेशन
११. ट्रेड लिबरलायझेशन अँड इंडियन अ‍ॅग्रीकल्चर : क्रॉपिंग पॅटर्न चेंजेस इफिसियन्सी गेन्स इन सेमी ॲरिड ट्रॉपीक्स्
१२. एक्सपोर्ट कॉम्पीटेटीव्हनेस ऑफ सिलेक्टेड अ‍ॅग्रीकल्चरल कमोडिटीज

*(टीप : वरील सर्व पुस्तकांचे अशोक गुलाटी ज्यांच्यासोबत सहलेखक आहेत त्यांचा उल्लेख वर केलेला नाही.)*

**एका बाजूला आधुनिक तंत्रज्ञान आणल्याचे श्रेय घ्यायचे. दुसऱ्या बाजुला अधिक मोठे मानसन्मान मिळवण्यास अडथळा होऊ नये म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाला विरोध करणाऱ्या झुंडींचा अनुनय करायचे ही स्वामीनाथन यांची कार्यपद्धती आहे. या उलट नॉर्मन बोरलॉग हे आधुनिक हरित क्रांती तंत्रज्ञानाचे खरे शिल्पकार. स्वामिनाथन यांचे कार्य फक्त भारतात कृषी विस्ताराचे आहे. त्यांचे कोणतेही मूलभूत संशोधनाचे योगदान नाही. डॉ. नॉर्मन बोरलॉग यांनी जैविक तंत्रज्ञानाचे जोरदार समर्थन केले. स्वामीनाथन यांच्यासारखा बोटचेपेपणा केला नाही. शरद जोशी आणि अशोक गुलाटी याच परंपरेतील आहेत.**

शरद जोशी आणि अशोक गुलाटी यांच्यात आणखी एक साम्य आहे. दोघांच्या ज्ञात मागील पिढीत कोणी शेतकरी नव्हते. शरद जोशींचे वडील गाव सोडून कोल्हापूरात वार लावून जेवून शाळा शिकले. पुढे पोस्टात कारकून म्हणून लागले. त्यांची बदली होईल तेथे शरद जोशींचे शिक्षण झाले. अपघाताने अभ्यासासाठी शेतीत आले. गुलाटी यांचा इतिहासही काहीसा असाच आहे.

अशोक गुलाटी पाकिस्तानातील पंजाब प्रांतात जन्मले. फाळणीनंतर निर्वासीत होऊन भारतात आले. दिल्लीत एका स्मशानात तंबू ठोकून निवासाची सोय झाली. फक्त तीन मढ्यांना पुरेल एवढी ती जागा. तेथून सरोजनी नगर येथे दोन खोल्यांच्या घरात चार भावंडासह राहू लागले. वडील कुठल्यातरी ऑफीसमध्ये टेलिफोन ऑपरेटर. दर महा ११ पैसे फी भरून सरकारी शाळेत गेले, त्यांना खेळाची खूप आवड. तरीही नेहमी वर्गात प्रथम, पण त्यांच्या वडिलांना खात्री नव्हती, हुशार मुले विज्ञान शाखेत जायची, पण वडिलांनी त्यांना वाणिज्य घेण्यास भाग पाडले. याबद्दल शिक्षकांनी विचारले तर वडील म्हणाले, ''याला चांगले मार्क्स कसे मिळाले हेच समजत नाही. कारण त्याला बसून अभ्यास करणे जमेल असे वाटत नाही.''

त्यांनी श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये प्रवेश घेतला. दरमहा ७ रूपये ९५ पैसे फी आणि ७ रुपयांची स्कॉलरशिप असा त्यांचा जमा खर्च होता. वर्गातील ४० पैकी ३८ मुले डून, झेवियर, कोलंबीयाचे उच्चभ्रू इंग्रजी माध्यमातील. तर गुलाटी हिंदी माध्यमातील. इंग्रजीवर प्रभुत्व नाहीच.

गुलाटी संख्याशास्त्रावरील एस. सी. गुप्ता यांचे पुस्तक वाचत होते. तर त्यांच्या प्राध्यपकांनी विदेशी लेखकांची पुस्तके वाचण्याचा सल्ला दिला; पण नंतर घेतलेल्या परिक्षेत गुलाटी सर्वप्रथम आले. यामुळे इतर मुलेही त्यांच्याशी मिळून मिसळून राहू लागली.

अर्थशास्त्राचा अभ्यास करताना देशातील विषमता त्यांच्या लक्षात आली. त्यामुळे काही काळ ते डावे झाले. त्यांची डॉक्टर बहीण लग्न करून अमेरिकेत स्थायिक झाली. तर अशोक गुलाटी यांनी बारा पानी पत्र लिहून तिचा निषेध केला. पदवीनंतर नोकरी करण्याऐवजी वेगवेगळ्या थोर नेत्यांची ३०० चरित्रे वाचण्यात त्यांनी वेळ घालविला. गुलाटी उच्च कुळातील नाहीत. ओळखीच्या ब्राम्हण मुलीशी लग्न केले. लग्नात सोने न घालण्याची अट भावी वधूला घातली.

त्यांचा शेतीशी संबंध अपघातानेच आला. त्यांच्या शिक्षकांनी पी.एचडी. साठी शेती विषय घ्यावा, असे सुचविले. देश समजून घ्यायचा असेल तर प्रथम शेती समजून घे, असे ते म्हणाले.

१९९७ सालीच त्यांचा सी.ए.सी. पी.साठी विचार झाला होता. त्यावेळी देवेगौडा पंतप्रधान तर कम्युनिस्ट चतूरानन मिश्रा शेती मंत्री होते. सी.ए.सी.पी.च्या अध्यक्षपदासाठी अभिजीत सेन व अशोक गुलाटी ही दोन नावे होती. कर्नाटकात काही वर्षे काम केल्याने देवेगौडाचा परिचय होता. देवगौडांना भेटल्यास तुमचे काम होईल असे कोणीतरी त्यांना सुचविले; पण नियुक्तीसाठी देवेगौडांना भेटण्यास त्यांनी नकार दिला.

शेतीमालाचे भाव ठरवताना शेतकऱ्यांना रास्त भाव, आंतरराष्ट्रीय भावाशी सलग्नता आणि ग्राहकाचे हित यात समन्वय करावे लागेल अशी त्यांची धारणा आहे. शेतीच्या विकासात भावाशिवाय रस्ते आणि वीज यांचेही मोठे योगदान आहे, अशी त्यांची धारणा आहे.

या वर्षी सरकारने ठरविलेल्या किमान आधारभूत किमती गहू आणि भाताला मिळाल्या नाहीत. उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्यप्रदेशात गहू आणि भात आधारभूत किमतीपेक्षा कमी भावात विकला गेला. तेथे आधारभूत किमतीत गहू, भात खरेदीची कोणतीही व्यवस्था नव्हती, तर गुलाटी यांनी शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीसाठी हेक्टरी २००० रुपये भरपाई द्यावी असा आग्रह केला आहे.

त्यांनी गहू व भात यांच्या निर्यातबंदीला विरोध केला. गव्हाची निर्यातबंदी उठविण्याचा निर्णय कृषीमंत्री शरद पवार यांनी १६ जुलै २०११ रोजी घेतला. तेव्हा अशोक गुलाटी यांनी त्यावर अतिशय तिखट शब्दांत प्रतिक्रीया दिली. ''शेतीमालाच्या निर्याती संबंधित खूप उशिराने, अत्यंत हळू, भित्रा, अतिशय सावध निर्णय घेण्याच्या पध्दतीमुळे देशाला पुन्हा पुन्हा खूप मोठी किंमत द्यावी लागत आहे. अशा पद्धतीचे धोरण अजिबात चालणार नाही.'' शेतकऱ्यांना गव्हाला आधाराभूत किंमत न मिळल्याची नुकसान भरपाई मिळावी म्हणून त्यांनी आग्रह धरला.

साखर उद्योग आणि शेतकरी नेते यांनी अशोक गुलाटी यांच्यामध्ये आपले प्रश्न सोडवून घेण्यासाठी एक मित्र मिळाला आहे. शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्याचे शरद जोशी यांचे स्वप्न पुरे करण्यात डॉ. अशोक गुलाटी यांचा मोठा वाटा असेल, याबाबत मला शंका वाटत नाही.

**अजित नरदे**
१८-अ, श्रध्दा संकूल, दुसरा मजला,
६ वी गल्ली, जयसिंगपूर,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)
मोबाईल : ९८२२४ ५३३१०


■■

# 'स्वातंत्र्य का नासले?' पुस्तकाविषयी

**आपला देश इंग्लंड अमेरिकेसारखा संपन्न व्हावा याविषयी देखिल आम सहमती नव्हती. गरिबीचे तत्त्वज्ञान ज्याच्या त्याच्या तोंडी खेळत होते. हाती पैसा येत असेल, तर हपापा गिळल्याशिवाय सोडण्याचा नि:संग वैरागी कोणीच नव्हता, आपली पोळी भाजून घ्यावी, आपल्या माणसांचे भले करावे आणि साऱ्या जगाला मात्र वैराग्य आणि संयम आणि साधेपणा यांचा बडेजाव सांगावा अशी नीतीमत्ता रुढ होती. महात्मा गांधींच्या नेतृत्वाच्या काळातसुद्धा आर्थिक संपन्नतेला ध्येय म्हणून सर्वमान्यता तर नव्हतीच; पण श्रीमंतीचा राग असल्याचा एक देखावा तरी होता, शेतकऱ्याने दिवसभर कष्ट करावे आणि त्या कष्टाचे फळ, मुलाबाळांसह परमेश्वराच्या भजनात आनंदाने उपभोगावे, अशी भाबडी सामाजिक मान्यता होती. आज देशातील भ्रष्टाचाराची प्रकरणे पाहिल्यानंतर त्यावेळच्या काळाचे शरद जोशींनी केलेले विवेचन किती तंतोतंत लागू पडते हे पटते.**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. येणारा ६४ वा स्वातंत्र्य दिन आपण साजरा करणार आहोत. १९९७ मध्ये स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्यात आला. डिसेंबर १९९८ मध्ये शरद जोशींनी स्वातंत्र्याच्या ५० वर्षांचा जमाखर्च मांडणारे आणि त्या अगोदरचे स्वातंत्र्यलढ्याचे आणि जागतिक पार्श्वभूमी यांचे परिशीलन करणारे 'स्वातंत्र्य का नासले?' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकातून त्यांनी केलेली काही भाकीते, दुर्दैवाने सुवर्णमहोत्सवानंतर १३ वर्षांनी खरी ठरत आहेत. देश एका बाजूला महासत्ता बनणार, अशी स्वप्ने बघत असतानाच विनाशाच्या खाईत लोटला जात आहे. हे पुस्तक पुन्हा एकदा वाचावे असे मनात आले आणि वाचल्यानंतर लिहिणेही गरजेचे आहे असे वाटले. पुस्तकाच्या सुरुवातीलाच 'नमनाचे पळीभर तेल' हे शीर्षक असलेल्या भूमिकेत तत्कालीन आर्थिक अरिष्टे आणि देशात पहिल्यांदाच स्थापन झालेले पूर्णपणे काँग्रेस विरहीत सरकार रालोआ यांची मीमांसा केली आहे. भाजपही सत्तेत गेल्यानंतर आर्थिक धोरणांच्या बाबतीत अगोदर स्वदेशीचे जप जपताना थकला नाही आणि खुर्चीत बसताच काँग्रेसचाच आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम पुढे आम्हीही चालवू असे म्हणून मोकळा झाला. अर्थात काँग्रेसने हाती सत्ता राहील, अशा कलाकलाने केलेल्या आर्थिक सुधारणांचा कार्यक्रमच रालोआ पुढे चालविल. आपला ठसा आणि खऱ्याखुऱ्या आर्थिक सुधारणा करणार नाही, हेच स्पष्ट करून टाकले, याचेही विवेचन केले आहे.

पहिल्या प्रकरणाचे शीर्षकच पंडित नेहरूंच्या संसदेतील गाजलेल्या भाषणाचे 'नियतीची गाठभेट' हे आहे. त्या भावूक भाषणानंतर भारतीयांचा चाललेला नियतीशी लढा हा संपणारा नाही आणि चर्चिलने भारताला स्वातंत्र्य देण्याअगोदर केलेली अभद्रवाणीच कशी खरी ठरत आहे? हे सांगितले आहे. स्वातंत्र्य लढा लढून आपल्याला स्वातंत्र्य मिळाले हा इंग्रजी साम्राज्याचा दुसऱ्या महायुद्धात थकलेला सिंह आणि डबघाईस आलेली आर्थिक स्थिती यामुळे स्वातंत्र्य मिळाले या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. आपले स्वातंत्र्य हे अपघाती स्वातंत्र्य आहे, असे म्हटले आहे. स्वातंत्र्यानंतर काही चांगल्या गोष्टी घडल्या. त्यामध्ये राहणीमानात थोडीशी झालेली सुधारणा एवढीच काय जमेची बाजू आहे.



ज्ञानेश्वर शेलार

दुसऱ्या प्रकरणात 'आत्मपरीक्षण' आणि 'आत्मवंचना' केली आहे. स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी असलेला उत्साह फार काळ टिकला नाही. पहिली दोन-पाच वर्षेसुद्धा टिकला नाही, आज तर केवळ सरकारी कार्यालयांवर कर्मचारी आणि मंत्र्यांनी झेंडा फडकवणे एवढेच त्याचे स्वरूप राहिले आहे. सामान्य जनतेला हा दिवस अजिबात आपला वाटत नाही. ५० वर्षांनंतरची परिस्थिती अशी का झाली? याची अनेक कारणे, अनेक अभ्यासक देतात? चुका काय झाल्यात आणि बरोबर काय हे सांगताना




**डिसेंबर १९९८ मध्ये शरद जोशी यांनी स्वातंत्र्याच्या ५० वर्षांचा जमाखर्च मांडणारे आणि त्या अगोदरचे स्वातंत्र्यलढ्याचे आणि जागतिक पार्श्वभूमी यांचे परिशीलन करणारे 'स्वातंत्र्य का नासले?' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकातून त्यांनी केलेली काही भाकीते, दुर्दैवाने सुवर्णमहोत्सवानंतर १३ वर्षांनी खरी ठरत आहेत.**

**गांधींच्या चेल्यांनीच त्यांचा कसा पराभव केला हे येथे सांगितले आहे. स्वातंत्र्य आले ते जोतिबा फुल्यांच्या भाकिताप्रमाणे पेशवाईचे नवे रूप घेऊन. गोऱ्या इंग्रजांची जागा काळ्या इंग्रजांनी घेतली. गांधीवादी ग्रामीण अर्थव्यवस्था त्यांना परवडणारी नव्हती. याउलट समाजवादाच्या नावाखाली सर्व सत्ता आपल्या हाती घेण्याची शक्यता दिसताच आंग्लाळलेल्या काँग्रेसनेच गांधी नेतृत्वाचा मुखवटा सहज फेकून दिला. स्वातंत्र्यानंतर लगेच देशाचे काळे आणि गोरे इंग्रज असे विभाजन झाले. हा शेतकरी संघटनेचा जगप्रसिद्ध विचार येथे सांगितला आहे.**

कोणी म्हणतो लोकसंख्या आटोक्याबाहेर गेली म्हणून असे झाले. कोणी म्हणतो भ्रष्टाचार माजला, कोणी म्हणतो- आपल्याला राष्ट्रप्रेमच नाही, देशाकरिता त्याग करण्याची तयारीच नाही... म्हणून स्वातंत्र्य नासले. देशात लोकशाही आणली ही चूकच झाली. आमच्या लोकांना हुकूमशाहीच सोसते. प्रौढ मतदानानेच सगळे वाटोळे केले, तर भाषावार प्रांतरचनेमुळे देश दुभंगला असा सूर कोणी धरतो. आमच्या पूर्वापारच्या परंपरा विसरलो. पश्चिमी देशांच्या धार्मिकता, लोकतंत्र असल्या संकल्पना मानू लागलो म्हणून देशाचा अधःपात झाला. यावर उपाय म्हणून कोणी म्हणतो शाळा काढा, कोणी म्हणतो गरिबांचे भले करा, विषमता दूर करा, अशा चारही बाजूंना गोंगाट चालू आहे. जो तो शहाणपणच शिकवतो. ५० वर्षांत बहुतेक काळ ज्यांनी सत्ता गाजविली ते काँग्रेसवाले भाजपची सत्ता येताच आमच्या हातात सत्ता होती तोपर्यंत ठीक होती असा कांगावा करीत आहेत. अशा प्रकारचे विविध प्रश्न शरद जोशींनी उपस्थित केले आहेत.

काँग्रेस राज्यात नेहरू-गांधी घराण्याच्या राजवटीत आखलेल्या धोरणांमुळे देशाचे वाटोळे झाले, ते आपल्या तोंडाने थोडेच कबूल करणार आहेत. नेहरूंनी केले ते त्यांच्या काळी योग्यच होते. समाजवाद, नियोजन यांखेरीज त्यावेळी देशाला पर्यायच नव्हता. त्याच दिशेने पुढे जाण्यासाठी स्वावलंबी सशक्त बनण्यासाठी, आता आर्थिक सुधारणा आणल्या जात आहेत, अशा तऱ्हेचा युक्तीवाद त्यांना स्वतःलाही पटत नाही. इतरांना समजण्या-उमजण्याचा प्रश्नच नाही. अशी काँग्रेसची भोंगळ भूमिका असल्याचे सांगितले आहे. डावे पक्ष आणि जातीयवादी यांची याच काळात विचित्र आघाडी बांधली गेली आहे. एका काळी समाजवादाच्या नावाखाली नेहरू ज्या धोरणांचा पाठपुरावा आणि समर्थन करीत त्याच धोरणांचा पुरस्कार एका काळी नेहरूंना विरोध करणारी ही मंडळी आता करीत आहेत. अशी कम्युनिस्टांची आणि जातीयवाद्यांची केवळ विरोधाची भूमिका असल्याचे शरद जोशींनी स्पष्ट केले आहे. याच प्रकरणातील अपराध्यांची तरफदारी नको या मुद्याचे विवेचन करताना त्यांनी जमाखर्चाच्या खटाटोपातील काही विचित्र गोष्टी सांगितल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर भल्या घोडचुका झाल्या हे सर्वमान्य; पण स्वातंत्र्याच्या काळात जे सत्तेवर होते आणि ज्यांच्यावर स्वातंत्र्यानंतरच्या घसरगुंडीची जबाबदारी आहे, ते मात्र सर्व महापुरुष आणि देवतासमान, त्यांच्यावर मात्र टीका करण्याचा सूरही निघत नाही. स्वातंत्र्याच्या ५० वर्षांत देशाचे वाटोळे झाले; पण ५० पैकी ३८ वर्षे राज्य करणारे नेहरू घराणे मात्र परम आदरणीय, परम कर्तबगार, परम सच्छील आणि यापुढेही जायचे ते पंडित नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी दाखवलेल्या दिशेनेच. (मृतांबद्दल वाईट न बोलण्याची भारतीय परंपरा आहे, असा खुलासा पटणारा नाही. खुद्द महात्मा गांधींबद्दल वाट्टेल तितके घाणेरडे बोलले जाते. 'हरिजन' शब्द वापरणे दुष्कर झाले आहे; पण सत्ता उपभोगलेल्या नेहरू घराण्याबद्दल मात्र अवाक्षर काढायचे नाही.) यात जमाखर्च मांडणाऱ्यांचा अप्रामाणिकपणा तरी असावा किंवा गंभीरपणे जमाखर्च मांडण्याचा त्यांचा वकूबच नाही, हे शरद जोशींनी ५० वर्षांच्या चुकलेल्या जमाखर्चाचे गणित मांडले आहे.

स्वराज्य आंदोलनातील विविध प्रवाह या प्रकरणात केवळ गांधींच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळाले हे खरे नसून त्यावेळी जहालांनी केलेले प्रयत्न, दुसऱ्या महायुद्धामुळे डबघाईस आलेले इंग्रजी साम्राज्य याचाही तेवढाच मोठा वाटा आहे, हे सांगितले आहे.

स्वातंत्र्य आले पंडित नेहरू पंतप्रधान झाले. इंग्रजी आमदानीत धन, विद्या आणि सत्ता संपादन केलेल्या चामडीचा रंग सोडल्यास सर्वतोपरी इंग्रजी असलेल्या नेतृत्वाकडे सत्ता केली. महात्मा गांधींच्या जनआंदोलनाच्या सामर्थ्याची आता या शहरी भद्र नेतृत्वास काही आवश्यकता राहिली नव्हती. गोडसेने गांधीजींचा देह संपवला, नंतर लगेच नेहरूंनी गांधींच्या अर्थ विचारावर आणि राजकीय विचारांवर हल्ला चढवला. 'गावकेंद्री अर्थव्यवस्था, शेती आणि उद्योगास प्राधान्य आणि न्यूनतम शासन' या ऐवजी 'शहरी उद्योगधंद्यांचा प्रभाव असलेली सर्वंकष सत्ता शासनाच्या हाती एकवटणाऱ्या व्यवस्थेकडे देशाची वाटचाल चालू झाली आणि


**पान २७ पाहा**

# राज ठाकरे उत्तर द्या!
# या अभागी शेतकऱ्यांनी जायचे कोठे?

**[ परप्रांतातून येणारे लोक हे शेती शोषणाच्या चरकातून बाहेर फेकले गेलेले अभागी शेतकरी आहेत हे लक्षात घेतले तर राज ठाकरे यांच्या उद्‌गारांतील क्रुरता लक्षात येइल. ज्यांनी नेहमी संपत्तीचा गुणाकार होतानाच पाहिला त्या राज ठाकरेंना शेतीत फक्त वजाबाकी व भागाकार होतो याचे ज्ञान नसणे स्वाभाविक आहे. ]**

जॉर्ज ऑरवेल नावाच्या लेखकाचं 'ॲनिमल फार्म' नावाचं एक छोटेखानी वाचनीय पुस्तक आहे. या पुस्तकात उपरोधिक पद्धतीने त्याने साम्यवादी सरकारच्या हुकुमशाही व भ्रष्ट कारभाराची येथेच्छ खिल्ली उडविली आहे. या पुस्तकातील एक लक्षवेधी वाक्य आहे- 'सर्व प्राणी समान आहेत, पण काही प्राणी अधिक समान आहेत!' हे वाक्य वाचल्यावर आपल्याकडे सर्रास वापरले जाणारे वाक्य आठवेल- 'कायद्यापुढे सर्व समान आहेत' पण ऑरवेलने म्हटल्याप्रमाणे आपल्या देशातही कायद्यापुढे काही लोक विशेष समान आहेत, काही तर परिवारच्या परिवार विशेष समान आहेत! काही परिवारांचा देशाच्या सत्तेवर जन्मजात हक्क असतो. तर काही परिवारांच्या मुठीत देशाचा कायदा आणि कायदा व सुव्यवस्था असते. ज्यांच्या हाती सत्ता किंवा ज्यांच्या मुठीत कायदा व सुव्यवस्था त्या परिवारांच्या घरात एखादे वेळेस सरस्वती जाण्यासाठी आढेवेढे घेईल; पण लक्ष्मी मात्र कोणतीही कुचराई न करता पैसा भरीत असते हा सार्वत्रिक अनुभव आहे. अशाच भाग्यशाली परिवारातून मनसेचे सर्वेसर्वा राज ठाकरे पुढे आलेले आहेत. परंपरागत सत्तेने त्यांना दगा दिल्याने त्यांची गिनती पहिल्या प्रकारच्या परिवारात करता येत नसली तरी दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे कायदा व सुव्यवस्था मुठीत ठेवण्याचा वारसा चालविण्यात पुढे असणारांत नक्कीच करता येईल. हा वारसा ते शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्यापेक्षाही अधिक सक्षमपणे चालवित आहेत यावर कोणाचेच दुमत असणार नाही.

या देशात एखाद्या सामान्य माणसाच्या हातून कायदेभंग झाला किंवा दुर्लक्षित करण्याजोगा क्षुल्लक गुन्हा घडला तरी पोलिसांसाठी त्याच्यावर हुकूमत गाजविण्याची, त्याच्यावर अत्याचार करण्याची पर्वणीच असते. अशा व्यक्तीला ते बिनदिक्कत मध्य रात्री त्याच्या घराचा दरवाजा तोडून ताब्यात घेतात; पण काही व्यक्तींच्या बाबतीत पोलिस कमालीचे असहाय्य असतात. त्यांनी कायद्याला व देशाच्या संविधानाला आव्हान दिले तरी पोलिस त्यांच्याशी किती अदबीने आणि नम्रतेने वागतात याची अनेक उदाहरणे देता येतील. आता राज ठाकरे यांचेच उदाहरण घ्या. परवानगीशिवाय सभा घेणे किंवा सभा बंदीचा आदेश मोडून सभा घेणे किंवा सभेत चिथावणीखोर भाषण देऊन भावना भडकविण्याचा प्रकार एकापेक्षा अधिक वेळा राज ठाकरे यांनी केला आहे. त्यांच्या अपराधाबद्दल जबाब घेण्यासाठी पोलिस त्यांच्या महालासमोर राजसाहेबांनी आत बोलाविण्याची वाट बघत ताटकळत उभे राहिल्याचे चित्र वृत्तवाहिन्यांवरून सर्वांनीच पाहिले आहे.



सुधाकर जाधव

संविधान आणि कायद्यासमोर सर्व समान असले तरी काही जास्त समान आहेत हे फक्त पोलिसच समजतात अशी समजूत करून घेण्याचे कारण नाही. संविधानाची प्रतिपालक असलेली न्यायालयेसुद्धा कधी कधी हे दाखवून देतात. मुंबई दंगली संदर्भात चौकशी आयोगाचा अहवाल आल्यानंतर दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात राज्य सरकारने साफ दुर्लक्ष केले. खूप दबाव आल्यावर एका प्रकरणात थोरल्या ठाकरेंविरुद्ध सरकारने खटला चालविण्याचे अवसान आणले; पण नंतर दस्तूरखुद्द न्यायालयाने कच खाल्ली. घटना घडून गेल्याच्या इतक्या दिवसांनंतर आता हा खटला चालविला तर ते जुन्या जखमांवरची खपली काढण्यासारखे होईल व त्यातून सामाजिक सद्‌भावाला तडा जाऊ शकतो या सबबीखाली उच्च न्यायालयाने खटलाच रद्दबातल केला होता! याच घराण्यातील राजबिंड्या राज ठाकरेंनी आधी नाशिक मुक्कामी व नंतर मुंबईत परप्रांतातून येणाऱ्या लोकांच्या लोंढ्यांची जहाल शब्दांत निर्भत्सना केली. आपल्या हाती सत्ता आली तर आपण हे लोंढे रोखून दाखवू अशी गर्जना करून भारतीय संविधानाला वाकूल्या दाखविल्या.

भारतीय संविधानाने या देशातील जनतेला

काश्मीर वगळता देशातील कोणत्याही गावात, शहरात आणि प्रांतात जाऊन काम करण्याचा आणि राहण्याचा मूलभूत हक्क दिला आहे; पण राज साहेब सध्या महाराष्ट्राचे नंदनवन बनाविण्याचा आराखडा तयार करण्यात व्यस्त आहेत. अर्थातच त्यांच्याकडे भारताच्या संविधानाचा अभ्यास करण्यासाठी वेळ नसणार हे उघड आहे. हा आराखडा तयार करण्यासाठी त्यांनी अनेक विचारवंतांना आणि प्रतिभावंतांना दावणीला बांधल्याची चर्चा आहे. यांच्या मदतीने तयार होणाऱ्या महाराष्ट्राच्या नंदनवनात परप्रांतीयाना काया प्रवेश असणार नाही ही बाब न सांगताही कळण्यासारखी आहे. म्हणजे त्यांच्या दिमतीला असणाऱ्या विद्वानांची संविधानाप्रति असणारी प्रतिबद्धता व आदर राजसाहेबांसारखाच असणार हे उघड आहे; पण संविधानाचे ज्ञान नसले किंवा संविधानाप्रती आदर नसला तरी या विद्वानांच्या मदतीने परकियांचा (भारतातील) महाराष्ट्र आणि विशेषतः मुंबई प्रवेश रोखण्याची योजना बनत असेल तर या समस्यांचा त्यांनी किमान आर्थिक-सामाजिक अंगाने विचार केला असेल अशी अपेक्षा तरी करता येते का?

मुंबई बॉम्ब स्फोटाचे खापर परप्रांतीयांच्या डोक्यावर फोडून राज ठाकरे यांनी आपल्याला सामाजिक, आर्थिक अंगानेही तर्कसंगत विचार करता येत नसल्याचे दाखवून दिले आहे. याचा अर्थ त्यांनी महाराष्ट्राचे नंदनवन बनविण्यासाठी जे विद्वान सल्लागार निवडलेत ते कुचकामी आहेत. मुंबईत हा लोंढा का येतो व तो रोखण्यासाठी कायदा हातात न घेता काय उपाय योजना करता येतील त्याचे ज्ञान या विद्वानांनाही नाही. तसे असते तर ते राज ठाकरेंच्या वक्तव्यातून प्रकट झाले असते. परप्रांतीयांचा मुद्दा हा मुंबई महापालिकेची निवडणूक जिंकण्याची क्लृप्ती नसेल आणि राज यांना खरोखरीच यातून मुंबईवर पडणाऱ्या ताणाची, निर्माण होणाऱ्या अव्यवस्थेची, बजबजपूरीची चिंता असेल तर आधी लोंढा मुंबईकडे का येतो हे समजून घेतले पाहिजे. त्यांनी जवळ केलेल्या विद्वानांपेक्षा मुंबई बाहेरच्या अडाणी शेतकऱ्यांकडून त्यांना हे समजून घेता येईल.

**लोंढ्याचे अर्थशास्त्र**

मुंबई बॉम्ब स्फोटानंतरचे राज ठाकरे यांचे वक्तव्य ऐकून कोणालाही मुंबईत गुन्हेगारांचे लोंढे येत आहेत असेच वाटेल. अवैधरीत्या पाकिस्तानातून किंवा बांगला देशातून मुंबईत आलेल्या नागरिकांना त्यांनी या स्फोटांबद्दल जबाबदार न धरता सरळ मुंबईत येणारे परप्रांतीय यासाठी जबाबदार असल्याचे अतिशय बेजबाबदार, द्वेषमूलक व खोडसाळ विधान त्यांनी केले आहे. परप्रांतातून येणारे लोक हे शेती शोषणाच्या चरकातून बाहेर फेकले गेलेले अभागी शेतकरी आहेत हे लक्षात घेतले तर राज ठाकरे यांच्या उद्‌गारांतील क्रूरता लक्षात येईल. ज्यांनी नेहमी संपत्तीचा गुणाकार होतानाच पाहिला त्या राज ठाकरेंना शेतीत फक्त वजाबाकी व भागाकार होतो याचे ज्ञान नसणे स्वाभाविक आहे. जनगणनेची ताजी आकडेवारी पाहिली तर लक्षात येईल, की १२१ कोटी लोक संख्येपैकी आज ही सुमारे ८० कोटी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३० टक्के उत्पन्न शेतीक्षेत्राचे आहे आणि या उत्पन्नावर ७० टक्के लोक जगत आहेत. ७० टक्के उत्पन्न मोठ्या शहरात केंद्रीत आहे आणि त्यातही मुंबईत हे केंद्रीकरण इतर शहराच्या तुलनेत अधिक आहे. शहरात वाढते उद्योग, वाढत्या सेवा या कारणाने रोजगारही वाढताच राहतो. या उलट ग्रामीण भागात विशेषतः शेतीक्षेत्रात दिवसागणिक उत्पन्नाचे साधन गमविणारे हजारो हात आहेत. कथित मोठ्या शेतकऱ्याची दुसरी पिढी भूमिहीन बनते ही गरीब व गरिबीवृद्धीची गती आहे. एकूण शेतकरी कुटुंबांपैकी ७५ टक्के कुटुंबं हे अल्प आणि अत्यल्प भूधारक आहेत आणि तोट्यातील शेतीने अल्प व अत्यल्प भूधारक आपल्या हयातीतच भूमीहीन होऊन दुसऱ्या कामाच्या शोधात त्यांची भटकंती सुरू होते. गावात शेती व्यतीरिक्त दुसरा कोणताही रोजगार उपलब्ध नसल्याने शहराकडे धाव घेण्या व्यतिरिक्त त्यांच्याकडे दुसरा कोणताही पर्याय नसतो. शहर जितके मोठे व संपन्न तितक्या रोजगाराच्या संधी जास्त. देशातील गरीब अभाग्यांचा ओढा मुंबईकडे असण्यामागे आणि मुंबईत दररोज लोकांचे लोंढे येण्यामागे हे कारण आहे.

उत्तर प्रदेश व बिहारमधून जास्त संख्येने लोक येत आहेत हे खरे. त्याचे कारण या प्रदेशात इतर प्रांतांच्या तुलनेत शेतकरी कुटुंबांची संख्या जास्त असल्याने शेतीतून बाहेर फेकले गेलेल्यांची संख्या तेथे जास्त आहे. इतर राज्यांच्या तुलनेत या दोन प्रदेशांत शहरीकरणाचा वेग कमी आहे. जिथे शहरीकरण अधिक आहे किंवा शहरीकरणाचा वेग जास्त आहे तिथे रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होत असल्याने तेथील लोक जास्त संख्येने मुंबईसारख्या शहराकडे धाव घेत नाहीत; पण बिहार- उत्तरप्रदेशमधील अभागी शेतकऱ्यांना तसा पर्याय उपलब्ध नाही. मात्र हे लोंढे सगळे परप्रांतीय आहे ही निव्वळ कोल्हेकुई आहे. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातून शेतीच्या बाहेर फेकल्या गेलेले असंख्य शेतकरी कामाच्या शोधात मुंबई, पुणे, नाशिक अशा शहरांकडे धाव घेत आहेत. महाराष्ट्राचा जप करणारे राज ठाकरे अप्रत्यक्षपणे महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करीत आहेत.

शेतीत भरडून निघालेल्या, पिचून गेलेल्या या लोंढ्यांत बॉंब स्फोट घडविण्याइतकी ताकद असती तर अगतिक आणि लाचार बनून आपल्या पोराबाळांपासून शेकडो मैल दूर नरकीय जीवन जगायला मुंबईत नक्कीच आले नसते. आपल्या परिवारांपासून दूर राहणे कोणालाच आवडत नाही; पण शेतीतून बाहेर फेकल्या गेलेल्या या अभागी जीवांना आपल्या कुटुंबीयांना उपासमारीपासून वाचविण्यासाठी ताटातूट सहन करून मुंबईसारख्या शहराचा रस्ता पकडावा लागतो. मुंबई शहरात येणारा कोणीही आणि कधीही उपाशी राहत नाही ही मुंबईची ख्याती आणि सामर्थ्य. याचा खरे तर मुंबईकरांना अभिमान आणि गौरव वाटायला हवा. याच कारणासाठी मुंबई महाराष्ट्रात आहे याचा प्रत्येक महाराष्ट्रीयांना अभिमान वाटायला हवा. अशी मुंबई घडविण्यात देशातील सर्व भाषिक, सर्व जाती व धर्माच्या लोकांचा हातभार लागला आहे. आपल्या इतकीच मुंबई त्यांची आहे याचा विसर पडला तर राष्ट्राप्रती ती कृतघ्नता ठरेल. अभागी जीवांच्या पाठीवर मायेचा हात फिरविण्याऐवजी त्यांच्या पाठीत दंडुके घालून आत्महत्या करण्यासाठी गावाकडे हाकलून देत असेल तर तो समस्त शेतकरी व कष्टकरी जनतेवरील हल्ला समजून त्याचा मुकाबला केला पाहिजे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

**मधोमध**



# भारतीय जनता पार्टी (काँग्रेस गट) अर्थात 'पार्टी विथ डिफ्रन्सेस'

**दत्ता जोशी**
media.care.abd@gmail.com

भारतीय जनता पार्टी कर्नाटकात प्रथम सत्तेवर आली, तेव्हा या पक्षाला एच. डी. देवेगौडा यांचे चिरंजीव एच. डी. कुमारस्वामी यांच्याशी युती करावी लागली होती. या युतीचे फळ कटू राहिले आणि राज्यातील सत्तासंघर्षात सत्तेचाच बळी गेला. केंद्रात सत्तेवर असलेल्या काँग्रेस सरकारने त्यांच्या नित्यक्रमाप्रमाणे कर्नाटकातील सरकार बरखास्त करून तेथे राष्ट्रपती राजवट लागू केली. काँग्रेसच्या या निर्णयाविरुद्ध आणि कुमारस्वामींच्या 'दगाबाजी'विरुद्ध रान उठविण्यात भाजपा नेतृत्व यशस्वी ठरले आणि प्रथमच दक्षिणेतील एका राज्यात दोन तृतियांश बहुमताने भाजपाने सत्ता मिळविली. याच राज्यातील सत्तेने या पक्षाचे पुरते वस्त्रहरण केले आहे. 'पार्टी विथ डिफ्रन्स' आता 'पार्टी विथ डिफ्रन्सेस' बनली आहे असे म्हणता येईल किंवा मग या पक्षाचा हा चेहरा 'भारतीय जनता पार्टी (काँग्रेस गट) या नावाने इतिहासात नोंदविणे योग्य ठरेल.

भारतीय जनता पक्ष हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राजकीय अपत्य. गांधीहत्येनंतर नेहरुंनी अवलंबलेल्या संघाच्या मुस्कटदाबीला राजकीय परिभाषेत उत्तर देण्यासाठी 'भारतीय जनसंघा'ची स्थापना झाली आणि आणीबाणीनंतर सत्तेवर आलेल्या 'जनता पार्टी'तील दुफळीनंतर 'भारतीय जनता पार्टी' अस्तित्वात आली. पक्ष राजकीय असला तरी वारसा संघाचा असल्यामुळे या संस्थेत असलेली 'चारित्र्यवान व्यक्तींची परंपरा जपणारा पक्ष' या अर्थाने या पक्षाने बराच काळ 'पार्टी विथ डिफ्रन्स' हे बिरूद मोठ्या अभिमानाने मिरविले. पण विरोधी पक्ष म्हणून कामगिरी बजावताना चारित्र्य जपणे सोपे असते, सत्ता मिळाल्यानंतर मात्र निसरड्या शेवाळावरून पाऊल सांभाळण्याइतकेच हे चारित्र्य सांभाळणे अवघड असते याचा साक्षात्कार झाल्यानंतर या बिरुदाची आठवण कोणाही नेत्याने पुन्हा काढली नाही!

प्रारंभी १३दिवस, त्यानंतर १३ महिने सत्तेत राहिल्यानंतर पुढची १३ वर्षे सत्तेत राहण्याची या पक्षाची स्वप्ने पाच वर्षांतच धुळीला मिळाली. मागील निवडणुकीतही या पक्षाला सपाटून मार बसला आणि सत्तेच्या दाव्याची चर्चा करण्याच्या आसपासही त्यांनी पोहोचता आले नाही. मात्र या पार्श्वभूमीवर काही राज्यांत भाजपाला चांगले यश मिळाले. गुजरात आणि कर्नाटक ही दोन राज्ये त्या दृष्टीने अधिक महत्वाची, कारण राजकीय क्षेत्रात ज्या 'दोन तृतियांश बहुमता'ला खास महत्व असते, ते या दोन्ही राज्यांत पक्षाने मिळविले होते. राज्यातील जनता या पक्षाकडे मोठ्या विश्वासाने पाहत असल्याचाच हा पुरावा होता. या पार्श्वभूमीवर येथील सत्ताकारणाकडे पाहावे लागेल.

गुजरातेतील चित्र खूपच वेगळे आहे. एकेकाळी या राज्यातील भारतीय जनता पार्टीची शकले उडाली होती. केशुभाई पटेल आणि शंकरसिंग वाघेला यांच्यातील बंडाळीच्या काळात गाजलेले 'हुजुरिया' आणि 'खजुरिया' हे गट तेव्हाच्या सर्वपक्षीय बंडाळींमध्येही टोपणनावांचा विषय ठरले होते. केशुभाईंना पायउतार करून नरेंद्र मोदी यांच्याकडे सत्तासूत्रे सोपविण्याचा निर्णय पक्षाने घेतला, तेव्हा सर्वांच्याच भूवया उंचावल्या होत्या. एकेकाळी लालकृष्ण अडवानी यांच्या रथयात्रेचे सारथ्य करणारी, संघाचा प्रचारक म्हणून काही वर्षे कार्यरत राहिलेली ही व्यक्ती राज्यशकट कसे चालवू शकेल, पक्षांतर्गत बंडाळी कशी मिटवू शकेल अशा अनेक शंका त्या वेळी उपस्थित केल्या जात होत्या. मात्र त्यानंतर ज्या पद्धतीने त्यांनी प्रारंभी पक्षावर, मग सरकारवर आणि आता राज्यावर नियंत्रण मिळविले आहे ते पाहता तेथे विरोधी पक्षांना काही काम उरले आहे, असे वाटत नाही. 'राष्ट्रकार्यासाठी ब्रह्मचर्य' जपणाऱ्या मोदींनी सत्ता हाताळताना आपल्या व्यक्तिगत परिवाराला, त्यांच्या हितसंबंधाला कुठेही जवळ येऊ दिले नाही. गुजरातचा विकास एवढाच 'अजेंडा' त्यांनी जपला. त्यांच्या कारभारावर त्यांचा विरोधकच काय, पण शत्रूही बोट ठेवू शकणार नाही, अशी ही स्थिती आहे.

याच्या बरोबर उलट स्थिती कर्नाटकात निर्माण झाली. काँग्रेसने राष्ट्रपती राजवट लागू करण्यात केलेल्या घिसडघाईची आणि कुमारस्वामी यांनी केलेल्या विश्वासघाताची पूर्ण सहानुभूती भाजपाला मिळाली. येडीयुरप्पा यांनी केलेल्या 'या वेळा आम्हाला पूर्ण बहुमत द्या, मग आमचा चमत्कार पाहा' या आवाहनाला मतदारांनी भरभरून प्रतिसाद दिला आणि चक्क दोन तृतियांश बहुमताने भारतीय जनता पार्टी

<< = >>

**काँग्रेस हे भारतात एका राजकीय पक्षाचे नाव आहे, त्याही पेक्षा ते आता एका प्रवृत्तीचे नाव बनले आहे. या प्रवृत्तीची लागण 'पार्टी विथ डिफ्रन्स' असे बिरुद मिरविणाऱ्या भारतीय जनता पार्टीलाही झाल्याचे कर्नाटकातील नाटकाने समोर आले. त्यामुळे या पक्षाला आता 'पार्टी विथ डिफ्रन्सेस' असे म्हणावे असे वाटते आहे आणि त्याच बरोबर भाजपातील अशा नेत्यांमुळे या पक्षालाही आता 'भाजपा (काँग्रेस गट)' असे म्हणावे लागेल, अशी भीती वाटू लागली आहे.**

कर्नाटकात सत्तेवर आली.

जनसंघ ज्या काळात अस्तित्वात होता त्या काळात एखाद्या राज्यात सत्तेवर येण्याइतका तो कधीही प्रबळ नव्हता. भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेनंतर या पक्षाला दक्षिणेकडील राज्यांमध्ये कधीही जनाधार मिळालेला नव्हता. १९९४-९५ मध्ये कर्नाटकात झालेल्या विधानसभा निवडणुकीत येडीयुरप्पा यांच्याच नेतृत्वाखाली पक्षाने राज्य विधानसभेत ४० जागांपर्यंत मजल मारली, तेव्हा आपण सत्तेपर्यंत पोहोचू शकतो याची या पक्षाला जाणीव झाली. यानंतर सुमारे २० वर्षांच्या प्रदीर्घ मेहनतीनंतर मागील निवडणुकीत पक्षाने एच. डी. कुमारस्वामी यांच्याशी युती करून सत्तेत भागीदारी मिळविली. कुमारस्वामींची स्वार्थी खेळी आणि काँग्रेसचे डावपेच यांच्यामुळे हे सरकार बरखास्त झाल्यानंतर झालेल्या निवडणुकीत पक्षाने दोन तृतियांश बहुमत मिळविले आणि भाजपाच्या वाटचालीत एक विक्रम नोंदविला गेला.

पण हा आनंद फार काळ अनुभवता येऊ नये, अशीच परिस्थिती तेथे निर्माण झाली. सर्वात आधी विरोधी पक्षांनी तेथे रेड्डी बंधूंच्या खाण गैरव्यवहारांवर मोठ्या प्रमाणावर आक्षेप घेतले. रेड्डी हे कर्नाटक भाजपामधील एक बडे प्रस्थ. ते या पक्षाचे राज्यातील 'फायनान्सर' म्हणून ओळखले जातात. त्यांच्यावरील आरोपांनंतर येडीयुरप्पा यांनी त्यांची मंत्रिमंडळातून गच्छंती केली. त्या बरोबर या बंधूंनी बंड पुकारले आणि थेट येडीयुरप्पा यांच्या खुर्चीलाच त्यांनी आव्हान दिले.

### हे असे कसे घडले?

**पोलादी चौकटीतील कठोर शिस्तीच्या या पक्षा एका राज्याचा मुख्यमंत्री पक्षालाच आव्हान देऊ शकतो हे या पक्षाने बहुदा प्रथमच अनुभवले. असे असंख्य प्रकार काँग्रेसने पचविलेले आहेत. किंबहुना हाच या पक्षाचा चेहरा आहे. 'राज्यापेक्षा पक्ष मोठा, पक्षापेक्षा व्यक्ती मोठी आणि कोणाहीपेक्षा पक्षश्रेष्ठी सर्वात मोठी' हे काँग्रेसचे सूत्र. या वेळी हे सूत्र भारतीय जनता पार्टीमध्ये अनुभवण्यास मिळाले. आधी येडीयुरप्पा काहीही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते. ऐकून घेऊ लागले तेव्हा तेथेही 'पक्षश्रेष्ठींना सर्वाधिकार'चे नाटक खेळले गेले. येथेही गटबाजीचे दर्शन घडवीत आपल्यालाच बहुसंख्य आमदार आणि खासदारांचा पाठिंबा असल्याचे दाखविण्याची धडपड झाली.**

सुषमा स्वराज यांच्या मध्यस्थीनंतर ही बंडाळी शमली ! (महाराष्ट्रातील गोपीनाथ मुंडे यांचे बंडसुद्धा सुषमा स्वराज यांनीच थंड केले होते. ही काय जादू असावी बरे?) पण या साऱ्या प्रकारात राज्य सरकारची आणि भाजपाची लाज गेली ती गेलीच.

यानंतर स्थिती बदलली. येडीयुरप्पा यांचे अनेक पैलू यानंतर समोर येऊ लागले. राज्य मंत्रिमंडळातील एका महिला मंत्र्यांशी त्यांची असलेली जवळीक आणि त्यांना मंत्रिमंडळातच ठेवण्याचा त्यांचा हट्टाग्रह सर्वांच्याच चर्चेचा विषय बनला. यानंतर त्यांच्या मुलांवर जमिनी बळकावण्याचे आरोप होऊ लागले. रेड्डी बंधूंच्या खाण गैरव्यवहाराचा विषय तर आधीपासूनच विरोधकांच्या अजेंड्यावर होताच. मधल्या काळात कर्नाटकचे लोकायुक्त हेगडे यांच्या अहवालावरून वादळ उठले आणि येडीयुरप्पांच्या राजीनाम्याची मागणी होऊ लागली. जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात लोकायुक्तांनी सादर केलेला गोपनीय अहवाल 'पद्धतशीरपणे' फुटला आणि त्यात येडीयुरप्पा यांच्यावर करण्यात आलेल्या थेट आरोपांमुळे त्यांचा राजीनामा मागण्याला वेग आला आणि अखेर त्यांना राजीनामा द्यावा लागला. प्रारंभी राजीनाम्यास नकार देणारे, नंतर स्वतःचे राजकीय बळ दाखविणारे आणि बंडखोरीची भाषा करणारे येडीयुरप्पा राजीनाम्यानंतर मात्र आपला राजकीय वारस आपल्या मर्जीतील असावा या साठी प्रयत्नशील दिसले. निर्णय जाहीर झाल्यानंतर प्रत्यक्ष राजीनामा देण्यासही त्यांनी एक दिवसाचा अवधी घेतला. या काळात त्यांनी किती फायली हातावेगळ्या



**नरेंद्र मोदी आणि बी. एस. येडीयुरप्पा हे भारतीय जनता पार्टीचे दोन चेहरे. विकासाच्या मार्गाने गेल्यास इतर सारे आरोप निष्प्रभ ठरतात हे मोदींनी दाखवून दिले. ज्या मुद्द्यांवरून त्यांना जगभरात बदनाम करण्यात आले त्या गोध्रा परिसरातील लोकप्रतिनिधी भाजपाचेच आहेत. स्वच्छ राज्यकारभार केल्यास समाज इतर गोष्टींकडे कानाडोळा करतो हे यातून दिसले, तर जनतेने मोठ्या अपेक्षेने सत्ता सोपविल्यानंतर पाऊल घसरले आणि राज्यकारभार बिघडला तर काय होते हे कर्नाटकातून दिसले. भाजपाच्या काँग्रेसीकरणाची प्रक्रियाच जणू कर्नाटकातून सुरू झाली आहे. भ्रष्टाचाराच्या विविध मुद्द्यांवरून केंद्रातील सत्तारूढ आघाडीला झुंजवताना आणि भविष्यात केंद्रातील सत्तेवर दावा करताना भाजपाला आधी कर्नाटकातील डाग धुवून काढावे लागतील.**

केल्या, याचा शोध घ्यावा लागेल. या साऱ्या घटनाक्रमात भारतीय जनता पार्टीची अब्रू मात्र पूर्णपणे धुळीला मिळाली. पक्षशिस्त, राजकीय चारित्र्य आणि स्वच्छ प्रशासन या तीनही आघाड्यांवर या राज्यात तरी हा पक्ष पूर्णतः हतप्रभ ठरला. त्याचे साहजिक पडसाद राष्ट्रीय राजकारणावर उमटणार.

हे असे कसे घडले? पोलादी चौकटीतील कठोर शिस्तीच्या या पक्षा एका राज्याचा मुख्यमंत्री पक्षालाच आव्हान देऊ शकतो हे या पक्षाने बहुदा प्रथमच अनुभवले. असे असंख्य प्रकार काँग्रेसने पचविलेले आहेत. किंबहुना हाच या पक्षाचा चेहरा आहे. 'राज्यापेक्षा पक्ष मोठा, पक्षापेक्षा व्यक्ती मोठी आणि कोणाहीपेक्षा पक्षश्रेष्ठी सर्वात मोठी' हे काँग्रेसचे सूत्र. या वेळी हे सूत्र भारतीय जनता पार्टीमध्ये अनुभवण्यास मिळाले. आधी येडीयुरप्पा काहीही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते. ऐकून घेऊ लागले तेव्हा तेथेही 'पक्षश्रेष्ठींना सर्वाधिकार'चे नाटक खेळले गेले. येथेही गटबाजीचे दर्शन घडवीत आपल्यालाच बहुसंख्य आमदार आणि खासदारांचा पाठिंबा असल्याचे दाखविण्याची धडपड झाली. अखेर 'सायंकाळी ५ पर्यंत राजीनामा दिला नाही तर पक्षातून काढून टाकण्यात येईल' या इशाऱ्यानंतर 'अमावस्या संपल्यानंतर राजीनामा देईन'ची घोषणा येडीयुरप्पा यांनी केली.

नव्या कार्याचा प्रारंभ करताना तो शक्यतो अमावस्येला करू नये, असा संकेत अनेक जण पाळत असतात. पण एखाद्या कार्याची अखेर करतानाही हा संकेत बहुदा पहिल्यांदाच पाळला गेला असावा. या अमावस्येच्या अंधारात 'विधानसौधा'मध्ये आणखी काय कृष्णकृत्ये झाली, हे कदाचित उघडकीस येणार नाही किंवा त्यासाठी बराच कालावधी लागेल! वारसदार शोधतानाही तो आपल्या मर्जीतील असावा या दृष्टीने त्यांनी आधी आपल्या मैत्रिणीचा आग्रह धरला आणि नंतर विश्वासू सहकाऱ्याचा...!

हे सारे काय चालले आहे? काँग्रेसने साऱ्या गैरव्यवहारांचे कळस गाठले आहेत. त्यांच्याविरुद्ध देशभर जनमत प्रक्षुब्ध आहे. लोकपालाच्या मुद्द्यावरून जनतेला मूर्ख बनविण्याचा संपूर्ण ठेका काँग्रेसने कपिल सिब्बल यांना दिला आहे. कलमाडी, राजा तुरुंगात आहेत. दयानिधी मारन त्याच मार्गावर आहेत. चिदंबरम यांनाही तिथपर्यंत जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. पंतप्रधान मनमोहनसिंग हे स्वच्छ प्रतिमेचे नेते सध्या सरकारचे नेतृत्व करीत आहेत. पण, म्हणजे ते काय करीत आहेत हेच कळत नाही! प्रारंभी त्यांनी पंतप्रधानांचा समावेश लोकपालाच्या कार्यकक्षेत व्हावा, असे विधान केले होते. आता त्यांनी त्यावरून घुमजाव केले आहे. कदाचित त्यांना आपल्या युवराजांची- भावी पंतप्रधानांची काळजी असावी! या पार्श्वभूमीवर रान माजविण्याची सुवर्णसंधी भाजपासमोर होती. त्याचा त्यांनी पुरेपूर लाभ उठविलाही. पण येडीयुरप्पांच्या मुद्द्यावरून त्यांची कोंडी करण्याचा पुरेपूर प्रयत्न त्यांच्या विरोधकांनी केला आणि आता तर लोकायुक्तांच्या अहवालातील उल्लेखाने त्यांची बोलती बंद झाली आहे.

नरेंद्र मोदी आणि बी. एस. येडीयुरप्पा हे भारतीय जनता पार्टीचे दोन चेहरे. विकासाच्या मार्गाने गेल्यास इतर सारे आरोप निष्प्रभ ठरतात हे मोदींनी दाखवून दिले. ज्या मुद्द्यांवरून त्यांना जगभरात बदनाम करण्यात आले त्या गोध्रा परिसरातील लोकप्रतिनिधी भाजपाचेच आहेत. स्वच्छ राज्यकारभार केल्यास समाज इतर गोष्टींकडे कानाडोळा करतो हे यातून दिसले, तर जनतेने मोठ्या अपेक्षेने सत्ता सोपविल्यानंतर पाऊल घसरले आणि राज्यकारभार बिघडला तर काय होते हे कर्नाटकातून दिसले. भाजपाच्या काँग्रेसीकरणाची प्रक्रियाच जणू कर्नाटकातून सुरू झाली आहे. भ्रष्टाचाराच्या विविध मुद्द्यांवरून केंद्रातील सत्तारूढ आघाडीला झुंजवताना आणि भविष्यात केंद्रातील सत्तेवर दावा करताना भाजपाला आधी कर्नाटकातील डाग धुवून काढावे लागतील. हे कसे धुवायचे, हा या पक्षाच्या नेतृत्वाचा प्रश्न आहे. त्यातूनच भविष्यातील त्यांच्या राजकारणाची दिशा स्पष्ट होणार आहे. कारण स्वच्छ कापडावरील डाग अधिक उठून दिसतात!

**दत्ता जोशी**
मो. ९२२५३०९०१०

■■

# भोंडला, हादगा आणि भुलाबाईची गाणी : उत्तरार्ध

**शेतकऱ्यांमधील दानशूरपणाची परंपरा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. शेतकऱ्याच्या घरी येणारा पाहुणा कधीच उपाशी जात नाही. चहा-सुपारीवर पाहुण्याची बोळवण करणे अजूनही शेतकऱ्याला जमलेच नाही. अर्धा लाख मासिक मिळकत मिळवूनही भिकाऱ्याच्या ताटात चार आणे टाकण्यासाठी का-कूकरणे किंवा त्याऐवजी भिकाऱ्याला दुनियाभराची अक्कल सांगत सुटणाऱ्यांच्या या देशात आजही शेतकऱ्याच्या दारात भिक्षेकरी गेला तर त्याच्या झोळीत अगदीच सहजपणे शेर-दोन शेर धान्य पडतच असते. स्वेच्छेने लोकवर्गणी देऊन गावात एखादा सार्वजनिक उत्सव साजरा करणे त्याच्या अंगवळणीच पडले आहे.**

**मामाजी, मामाजी बाबा आले न्यायाला**
**जाऊ काजी माहेरा, माहेरा**

पण सासरा तरी वेगळं काय बोलणार? सुनेला माहेरी पाठवायचे म्हणजे निदान तिला जाण्यापुरता तरी घरात पैसा असावा की नाही? नसणारच. म्हणून तर तोही आपल्यावरची जबाबदारी दुसऱ्यावर ढकलून मोकळा होतो.

**मला काय पुसते, बरीच दिसते**
**पूस आपल्या नवऱ्याला, नवऱ्याला**

आता शेवटला पर्याय. तिची माहेराला जाण्याची हक्काची मागणी कोणीच समजून घेतली नाही; पण आता परवानगी देण्याचे अधिकार थेट नवऱ्याच्याच हातात आले आहे. तिच्या व्याकूळतेची तीव्रता नवऱ्याला तरी नक्कीच कळलेली असणार, असे तिला वाटते. तिला खात्री आहे, की आता नक्कीच जायला मिळणार. बस्स एवढ्याच तर आशेपायी ती नवऱ्याला विचारायला जाते.

**स्वामीजी, स्वामीजी बाबा आले न्यायाला**
**जाऊ काजी माहेरा, माहेरा**

पण प्राणप्रियेच्या प्रश्नाला नवरा उत्तरच देत नाही. नवरा काय म्हणतो हे गीतात लिहिलेलेच नाही. गीताचा दोन ओळीत थेट शेवटच करून टाकण्यात आला आहे.

**घेतलीय लाठी, हाणलीय पाठी,**
**तुला मोठं माहेर आठवते, आठवते!!**



गंगाधर मुटे

पीएचडी, डी.लिट मिळवून किंवा वेदपुराण, कुराण, बायबल, कौटिल्य, चाणक्य किंवा हजारो पानांचे अर्थशास्त्राचे पुस्तक वाचूनही जेवढे गाव, गरिबी आणि शेतीचे अर्थशास्त्र समजून घेता येत नाही त्यापेक्षा जास्त वास्तववादी अर्थशास्त्र या एका गीतात सामावले आहे, याची मला खात्री आहे.

भुलाबाईची गाणी ही तत्कालीन सामाजिक संस्कृतीचे दर्शन घडवितात. काही गाणी सामाजिक आणि आर्थिक शोषणाला नकळतपणे प्रतिबिंबित करून जातात. या गीतांचे गेयता आणि आशय हेच बलस्थान असल्याने त्यात रचनाशैली, खोटा समाजाभिमूख बेगडीपणा, अलंकारिक शब्दरचना वगैरे कृत्रिमरित्या अनावश्यकपणे घुसडण्याची त्या महिला गीतरचनाकारांना गरजच भासलेली दिसत नाही. मिरची-मसाला न वापरता आहे तेच वास्तव शब्दात उतरविण्याचा प्रयत्न केल्यानेच या गीतांना अस्सल अभिजातपणा आलेला आहे आणि म्हणूनच त्यात ग्रामीण जीवन आणि ग्रामसंस्कृतीचे अनेक पदर सहजपणे प्रतिबिंबित झालेले आहेत. हे गीत बघा.

**वैदूदादा, वैदूदादा घरावरी चाल गा, चाल गा**
**बुढ्याचे मचले हाल गा, हाल गा**
**माही (माझी) सासू म्हणते गा, म्हणते गा**
**तुले खुट्याची म्हैस देते गा, देते गा**

घरात म्हातारा सासरा बिमार झालाय म्हणून वैद्याला बोलवताना त्याला उपचाराची फी म्हणून चक्क खुट्याची म्हैस देण्याचा वायदा करणे म्हणजे काय? नगदी फी का देऊ नये? शिवाय वैद्याची फी आणि म्हशीची किंमत यात

खूपच तफावत आहे. या गीताचे दोन अर्थ निघू शकतात.

खिशात रोकड नसली आणि एखादी वस्तू उधार मागायची म्हटले तर थेट तसे उधार न मागता आडवळणाने मागणी प्रस्तूत करायची एक पद्धत आहे. ती आजतागायत वापरातसुद्धा आहे. शेतकऱ्याच्या घरात वर्षातून एकदाच पैसा येत असल्याने व खर्च मात्र वर्षभर करावे लागत असल्याने त्याच्या उधारीचा प्रकारही दीर्घमुदतीचा असतो. स्वाभाविकपणे वैद्य वगैरे एका वर्षाच्या उधारीवर औषधोपचार करायला सहजासहजी तयार होत नसावेत म्हणून गरजेपोटी म्हैस देऊन किंवा म्हैस देण्याची भाषा करून उधारीवर औषधोपचार करून घेणे ही अपरिहार्यता असावी, हे स्पष्ट आहे

किंवा दुसरा अर्थ असाही निघतो, की सासऱ्याचा जीव वाचविण्याच्या बदल्यात वैद्याला म्हैस देण्याची भाषा सासू-सुनेने स्वेच्छेनेच केली असावी. शेतकऱ्याला बळीराजा म्हणतात कारण बळीराजाच्या दानशूरपणाचा गुण शेतकऱ्याच्या रक्तामांसात पुरेपूर भिनलेला आहे. आजही शेतकरी समाजाएवढे दानशूर दुसरे कोणीच नाही. अन्नदानाच्या बाबतीत आजही शेतकरी समाज सर्वांत पुढे आहे. गणेश स्थापना, महालक्ष्मी स्थापना, माऊंदे, बारसे, लग्नकार्य, व्रतांचे उत्थापन या निमित्ताने शेतकऱ्यांच्या अंगणात जेवढ्या पंगती बसतात, तेवढे अन्नदान अन्य कोणत्याच समाजात होत नाही, ही वास्तविकता आहे. वर्षभर घरात चटणी-भाकर खायची; पण अन्नदान करताना इतरांना वरण-भात-भाजी-पोळी खाऊ घालायची हा शेतकरी समाजाचा धर्मच बनला आहे. ही वृत्ती चांगली की वाईट, हा स्वतंत्र वादाचा विषय असू शकेल पण शेतकरी माणसापेक्षा पन्नास पटीने अधिक मिळकत मिळविणारी बिगर शेतकरी मंडळी आपली संपूर्ण मिळकत स्वतःच्या स्वतःपुरत्या मर्यादित प्रपंचातच खर्च करीत असतात. स्वतः फारसे दान वगैरे करीत नाहीत आणि शेतकरी करतो त्याचे कौतूकही करीत नाहीत, याउलट शेतकरी उधळखोर असल्याने कर्जबाजारी होतो असा शिक्का मारून मोकळे होतात.

शेतकऱ्यांमधील दानशूरपणाची परंपरा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. शेतकऱ्याच्या घरी येणारा पाहुणा कधीच उपाशी जात नाही. चहा-सुपारीवर पाहुण्याची बोळवण करणे अजूनही शेतकऱ्याला जमलेच नाही. अर्धा लाख मासिक मिळकत मिळवूनही भिकाऱ्याच्या ताटात चार आणे टाकण्यासाठी का-कू करणे किंवा त्याऐवजी भिकाऱ्याला दुनियाभराची अक्कल सांगत सुटणाऱ्यांच्या या देशात आजही शेतकऱ्याच्या दारात भिक्षेकरी गेला तर त्याच्या झोळीत अगदीच सहजपणे शेर-दोन शेर धान्य पडतच असते. स्वेच्छेने लोकवर्गणी देऊन गावात एखादा सार्वजनिक उत्सव साजरा करणे त्याच्या अंगवळणीच पडले आहे.

विनोबांच्या भूदान यज्ञात शेतजमीन दान करण्याची हिंमत शेतकऱ्यांनी दाखविली आहे. जनावरे (मुख्यतः गाय) दान करण्याची फार जुनी परंपरा आहे. काही काळापूर्वी झाडेसुद्धा दान दिली जात. आजही महसूल खात्याच्या नोंदी तपासल्या तर शेतीची मालकी एकाची आणि त्याच शेतातील झाडाची कायदेशीर मालकी दुसऱ्याची, असे प्रकार आढळतात.

वरील गीताचा समीक्षणात्मक अंगाने विचार केल्यास या गीतात गेयता, यमक आणि आशय वगळता अलंकार, उपमा, लेखनकौशल्य वगैरे फारसे आढळणार नाही पण आशयगर्भिता हेच या गीताचे बलस्थान आहे. चार ओळीच्या या गीतातील शब्दयोजना अत्यंत समर्पक व नेमकी असून दोनशे पानांचे पुस्तक लिहूनही जो आशय नेमकेपणाने व्यक्त करणे कठीण जाईल, एवढा प्रचंड आशय या गीतात ठासून भरला आहे.

मचणे हा शब्द सध्या प्रमाणभाषेत वापरला जात नाही आणि मचणे या शब्दाचा नेमका अर्थ व छटा प्रकट करणारा दुसरा पर्यायी शब्द प्रमाणभाषेत उपलब्ध नाही. मर्यादित शब्दात गेयता राखून अमर्याद आशय व्यक्त करायचा असेल तर मचणे या शब्दासारखे शब्द भाषेत असणे अत्यंत आवश्यक आहे आणि मोजक्या शब्दात बरेच काही व्यक्त करणारे शब्द असल्याखेरीज कोणत्याही भाषेला भाषासमृद्धी येऊ शकत नाही, हेही लक्षात घेणे तितकेच गरजेचे आहे.

'बुढ्याचे मचले हाल' याचा अर्थ वयाने म्हातारपणाकडे झुकलेल्या सासऱ्याला काहीतरी भयानक बिमारी झाली आहे. त्याच्या शरीरात उठणाऱ्या कळा आणि आत्यंतिक वेदनांमुळे तो विव्हळत, तळमळत किंवा तडफडत आहे, असा होतो.

जेथे मला अर्थ लिहायला दोन वाक्य व बावीस शब्द वापरावे लागले व पद्याचे गद्य झाले तेथे तेवढाच आशय या गीतामध्ये बुढ्याचे मचले हाल या तीनच शब्दांत व्यक्त झालाय आणि गेयताही निर्माण झाली. हे शक्य झाले ते केवळ मचले या शब्दाच्या वापरामुळेच.

गीतामध्ये वैद्यबुवाला घरावरी म्हणजे घरापर्यंत चाल असे म्हटलेले आहे, घरी ये असे म्हटलेले नाही. घरी ये असे म्हणण्यामध्ये औषधोपचार करण्यासाठी घरी ये असा अभिनिवेश असतो.

मात्र घरापर्यंत चाल याचा वेगळा अर्थ लागतो. खरे तर पेशंटला जेवढी वैद्याची गरज असते तितकीच किंवा त्यापेक्षाही जास्त गरज पापी पेट का सवाल है या न्यायाने वैद्याला पेशंटची असायला हवी. ज्या घरात आजारी व्यक्ती आहे ते घर जर ऐश्वर्यसंपन्न आणि आर्थिक सुदृढ असेल तर उपचारासाठी बोलावताना वैद्याची मिनतवारी करायची गरज भासूच नये. कर्तव्यदक्षता किंवा पैशांचा मोह या दोन कारणांपैकी निदान एका कारणाने तरी वैद्याने आजारी माणसाच्या घराकडे पळतच सुटायला हवे; पण या गीतातील आशयाचा मामला जरा वेगळा आहे. या म्हाताऱ्याच्या घरची आर्थिक स्थिती वैद्याला माहीत असणार म्हणून तो चालढकल करीत असावा. म्हणून सून जे म्हणते त्याचा अर्थ असा की,

हे वैद्यराजा, तू मला माझ्या थोरल्या दादासारखा आहेस. तू केवळ माझ्या घरापर्यंत चल. उधारीवर उपचार करायचे किंवा नाही याचा निर्णय तू नंतर घे, मला खात्री आहे की, तू घरापर्यंत आलास तर माझ्या सासऱ्याच्या वेदना पाहून तुझे अंतःकरण नक्कीच द्रवेल. समोरचे दृश्य बघून व्यावसायिक विचार बाजूला पडेल, उधार की नगदी यापेक्षा पेशंट व वैद्य यांच्यातील नात्याची आठवण तुला होऊन तुझ्यातला वैद्य जागा होईल. म्हणून तू इथून ऊठ, फक्त माझ्या घरापर्यंत चल आणि एक नजर माझ्या सासऱ्यावर तर टाक.

या चार ओळींच्या गीताची नायिका सून आहे. सामाजिक भान हरवलेल्या एखाद्या साहित्यश्रेष्ठ कवीने ही कविता लिहायला घेतली असती तर आजारी सासरा आहे मग वैद्याला बोलवायला सासूच जाऊ शकते, सुनेसाठी कवितेत स्थानच निर्माण होत नाही असे गृहीत धरून सासूलाच नायिका बनविले असते; पण या गीतात तसे झाले नाही. सून-सासू-सासरा या नात्याच्या उदात्तीकरणाचा प्रयत्न येथे झालेला दिसतो. या घरातली सून सासरा माझा कुरकूर करे, तिकडेच मरू दे त्याले, भवानी आई रोडगा वाहीन तुले असे म्हणणाऱ्यांपैकी नक्कीच



नाही. सासऱ्याचे दुःख पाहून व्याकूळ होणारी आहे. म्हाताऱ्याच्या उपचारासाठी खुट्याची म्हैस देऊन टाकू म्हणणाऱ्या सासूचे ती समर्थन करते. सासू सासऱ्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखविणाऱ्या उच्चभ्रू सभ्य संस्कृतीचा तिला अजून तरी वारा लागलेला दिसत नाही.

खुट्याची म्हैस देणे हेसुद्धा आशयगर्भ वाक्य आहे. तुकारामांनी भले आम्ही देऊ कासेची लंगोटी असे म्हटले. कासेची न म्हणता नुसतीच लंगोटी देऊ म्हटले असते तर त्याचा अर्थ परिणामकारकतेने प्रकट झालाच नसता. तसे म्हैस देणे आणि खुट्याची म्हैस देणे यातही फरक आहे. म्हैस देतो म्हणणे याचा अर्थ अनेक म्हशीपैकी एक देतो, असा निघू शकला असता. पण खुट्याची म्हैस देतो याचा अर्थ खुट्याला असलेली एकमेव म्हैस असाच घ्यावा लागेल. अशा परिस्थितीत खुट्याची म्हैस देण्याची भाषा दानशूर वृत्ती किंवा आत्यंतिक विवशता या दोनपैकी निदान एक तरी कारण स्पष्टपणे अधोरेखित करून जाते.

या चार ओळींच्या गीतातील एकेक शब्द तोलून-मापून वापरलेला दिसत आहे. नेमक्या शब्दप्रयोगामुळे मर्यादित शब्दांमध्ये अमर्याद आशय गुंफणारे कवित्व अशिक्षित ग्रामीण महिलांनी गेयस्वरूपात कवन केले आहे; पण या भुलाबाईच्या गीतांकडे साहित्यक्षेत्राने कधीच गंभीरतेने पाहिलेले दिसत नाही. ग्रामीण अशिक्षित जनजीवनामध्येही तोलमोलाचे काव्य रचण्याचे अंगीभूत कौशल्य असू शकते, भुलाबाईंची गाणीसुद्धा साहित्यक्षेत्राला मार्गदर्शक ठरू शकतात असे गृहीत धरून जर काव्यजगताची पुढील वाटचाल झाली असती तर मूठभर आशय व्यक्त करण्यासाठी ढीगभर शब्दांचे मनोरे रचून गेयता गमाविलेल्या गद्यस्वरूपातील निबंधांना कविता म्हणण्याचा प्रघातच पडला नसता. कवितेने सामाजिक बांधीलकी जपली असती तर कवीही स्वतःच्या एकलकोंड्या मानसिकतेतून बाहेर येऊन समाजाशी एकरूप झाला असता. कवितेला जनसामान्यांच्या सुखदुःखाची किनार लाभली असती तर कविता आमजनतेच्या भावविश्वाशी समरस झाली असती. आहे ते वास्तव साकारण्याचा प्रयत्न झाला असता तर कवितेच्या विषयामध्ये विविधता आली असती व काव्य लोकाभिमूख झाले असते आणि जर असे झाले असते तर कवी आणि कविता हा चेष्टेचा व उपहासाचा विषय नक्कीच झाला नसता अशी आता माझी खात्री पटायला लागली आहे.

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
www.baliraja.com
मो. ९७३०५८२००४

■■

# आरक्षण और अस्मिता

**आरक्षण इस देश की बहुसंख्यक जनता के सामने परोसा जा चुका लॉलीपॉप है. वो एक सनकी राजा और उसके प्रिय मिट्ठू के समान है जिसकी जान जा चुकी है किंतु किसी दरबारी में इतना सामर्थ्य नहीं है कि वह उस सनकी राजा को मिट्ठू की मौत की असलियत बताकर अपनी जान जोखिम में डाले. आज वोट बैंक की राजनीति के कारण कोई भी बहुसंख्यक वर्ग को वास्तविकता बताने की जोखिम लेने को तैयार नहीं है. आरक्षण के पक्ष या विपक्ष में नारे लगाने वाले दोनो ही वर्ग एक ही नाव की सवारी कर रहे है. किंतु एक वर्ग ऐसा भी है जो मुक्त अर्थव्यवस्था या प्रतियोगी बाजारवाद को मानने वाला है. आज उस वर्ग का कोई प्रवक्ता संसद या देश की विधानसभाओं में नहीं है. शेतकरी संघटन के अलावा तो आज ऐसा कोई राजनैतिक मंच भी नहीं है जो जातीय अस्मिता के नजरिये से नहीं बल्कि देश की समूची उत्पादकता को आरक्षण के गलत इस्तेमाल से मिलने वाली चुनौती के नजरिये से इस प्रश्न को देखता हो.**

फिल्म निर्माता प्रकाश झा की प्रस्तावित फिल्म आरक्षण को लेकर इस समय महाराष्ट्र जैसे देश के सबसे आधुनिक राज्य के पिछड़े वर्गों के नेता लामबंद हो चुके है. ज्योतिबा फुले, शाहूजी महाराज और डॉ. भीमराव अंबेडकर का दिन में पचासों बार नाम लेकर महाराष्ट्र को उनका राज्य बताने वाले ये नेता इस फिल्म के प्रदर्शन के विरूद्ध रणनीति बनाने पर जुटे है, जिसमें राष्ट्रवादी के श्री छगन भुजबल और जितेंद्र अव्हाड तथा रिपब्लिकन पक्ष के रामदास आठवले शामिल है. बहाना है, समाज की शांति भंग होने का. प्रश्न यह है कि जब वे ही लोग सत्ता में है तो शांति कौन भंग करने वाला है?

अभिव्यक्ति की स्वतंत्रता हमारे संविधान की मूलभूत भावना है, जो युद्ध जैसी स्थिति या आपातकाल के अलावा बाकी के समय में समाज के प्रत्येक व्यक्ति का जन्म सिद्ध अधिकार है. अपनी बात को लेखन, साहित्य, फिल्म या कला के अन्य माध्यमों के द्वारा अभिव्यक्त करने की स्वतंत्रता किसी भी सभ्य समाज के निर्माण की मूलभूत शर्त है. अपने को मिलने वाली सुविधाओं को किसी क्षुद्र अस्मिता से जोड़ कर उस पर उठने वाली हर ऊंगली को तोड़ देना या हर प्रश्न का गला घोंट देने की मानसिकता से इस देश या समाज का कोई भी भला होने वाला नहीं है. आरक्षण की व्यवस्था समाज के कुछ तबकों के लिये आज भी जरूरी हो सकती है लेकिन उस पर अब कोई बहस हो ही नहीं सकती, ऐसे दावे करना केवल और केवल तालिबान सदृश निजाम में ही संभव है. आरक्षण कोई देववाणी नहीं है कि जिसपर प्रश्न ही नहीं खड़े किये जा सकेंगे. स्वयं डॉ अंबेडकर ने भी उस व्यवस्था को एक अनादि अनंत कालों तक चलने वाली व्यवस्था न मानते हुये केवल अस्थायी रूप दिया था. आज यदि वह महापुरूष जीवित होता तो दलितों के सामाजिक पिछड़ेपन को किसी दूसरे वैकल्पिक तरीके से दूर करने के प्रयासों के बारे में जरूर सोच रहा होता.

महाराष्ट्र आज देश का सबसे प्रगतिशील राज्य है. मुंबई देश की आर्थिक राजधानी है. देश के सबसे ज्यादा मेडीकल, इंजिनिअरींग कॉलेज इसी राज्य में है. देश के सबसे ज्यादा उद्योग इसी राज्य में है. किंतु एक प्रश्न बार बार उठता है कि इस पूरी विकास की गाथा में राज्य का आरक्षित वर्ग कहाँ खड़ा है? इस दौर में जब की सरकार व्यापार या सेवा के क्षेत्रों से पीछे हट रही है, टैक्स वसुली जैसे कई काम नीजि क्षेत्र को सौंपे जा रहे है, उस दौर में अपनी अपनी जातियों को आरक्षण के लिये लामंबद करना, क्या उस समाज या जाति के साथ विद्रोह नहीं है? जब किसी भी समाज की गौरव यात्रा उस जाति के द्वारा पैदा किये गये अविष्कारकों, खोजियों या उद्योगपतियों से तय होने वाली हो, जब समृद्धि ही प्रतिभा को तोलने का पैमाना बन चुकी हो, तब अपनी अपनी जाति की प्रतिभाओं को केवल सरकारी नौकरीयों में झौंकते रहना कहाँ की बुद्धिमानी, कहाँ की जातीय अस्मिता है? ऐसी मूर्खतापूर्ण जातीय अस्मिता से कुछ लोगों का अल्पकालीन फायदा भले ही हो जाये, किंतु वह समाज या जाति सदा के लिये कोल्हू के बैल की तरह अपनी रोजी रोटी की लड़ाई लड़ती ही रहेगी.

दो दिन पहले मेरे अमरावती कार्यालय के सामने से लोकशाहीर अन्ना भाऊ साठे की जन्मतिथी के उपलक्ष्य में एक जुलूस निकला. शहर में चारों ओर लोक शाहीर के प्रति सम्मान जताने वाले नेताओं के पोस्टर लगे हुये थे. मेरे मन में एक ही प्रश्न बार बार उठता रहा कि जिस लोकशाहीर की शायरी या गीतों का एक छंद भी उस जुलूस में शामिल व्यक्ति उच्चारण नहीं कर सकता हो, जिसमें फिल्मों के गीतों की धुन पर जुलूस के जवान लड़के नाच गाना कर रहे हो, वह किन अर्थों में लोकशाहीर का सम्मान है? क्या हमने हमारे शाहीरों, कलाकारों या महान सपूतों को जातीय अस्मिता का झंडा या पोस्टर बनाकर उनका अपमान नहीं किया है? क्या अन्ना भाऊ साठे देश के किसी पिछड़े वर्ग में जन्म न लेकर उच्च वर्ण में जन्म ले लेते तो उनकी जन्मतिथी का जुलूस इसी प्रकार का होता और उनकी स्मृति में इतने ही नेताओं के पोस्टर लगते? जिन नेताओं को साने गुरूजी, पु.ल. देशपांडे या कुसुमाग्रज की जन्मतिथी मालूम न हो, उन्हें अन्ना भाऊ के समान दरिद्रभारत के लोक शाहीर से क्या लेना देना? लेकिन चुनाव और वोटों को दिमाग में रखकर



ॲड. दिनेश शर्मा

जहाँ साहित्यक सम्मानित हो, जहाँ कलाकारों की कला से ज्यादा उनका जन्मस्थान या जाति मायना रखती हो, उस बेईमान दौर के बारे में कुछ भी कहना व्यर्थ है.

आजादी के बाद की समूची पिछड़ी राजनीति अनेकानेक उतार चढ़ावों से होकर गुजरी है. इससे देश को कई क्षेत्रों में जहाँ बेशकीमती फायदे हुये है वहीं शासकीय सेवा क्षेत्र को इससे कितने फायदे हुये, यह विवाद का विषय है. आज हमारे पास मायावती, नरेंद्र मोदी, गहलोत, मीराकुमार या नितीशकुमार के जैसे देश की शान बढ़ाने वाले नेता है जो राजनीतिक प्रवाहों को बदल देने की क्षमता रखते है तो वहीं दूसरी ओर सारा सरकारी सेवा क्षेत्र केवल वेतन ज्यादा और कोई काम नहीं वाले मुफ्तखोरों का टैक्स फ्री झोन बन चुका है. ये लोग ही जातीय अस्मिता के असली शिल्पकार है क्योंकि मायावती हो या मीराकुमार, देश के सभी नागरिकों के वोट हासील करने के अपने प्रयासों में सभी को साथ लेकर चलने का आभास तो देते ही है. आप उन्हें हटा सकते है, उनके प्रतियोगियों से उनकी तुलना कर सकते है और उनके बारे में अपनी पसंद या नापसंद को बदल सकते है, जाहीर कर सकते है. लेकिन उन शासकीय कर्मचारियों का तो आप कुछ भी नहीं बिगाड़ सकते जो केवल और केवल अपने पूर्वजों के पिछड़े होने का फायदा लेने को ही जन्मा है. एक बार नौकरी पर लगने के बाद ही उसका सारा पिछड़ापन दूर हो जाता है, फिर भी जो जीवन भर अपने पिछड़े होने का रोना रोते रहता है और समाज के बाकी तबकों से यह उम्मीद करता है कि उसके आराम, पर्यटन, छुट्टीयों और सेवानिवृति की व्यवस्था वे लोग करें. वह ना तो राष्ट्रीय संपदा के निर्माण में कोई योगदान करना चाहता है ना ही कोई योगदान करे तो उनको प्रोत्साहित करना जानता है. वह ना तो काम करता है, ना जगह खाली करता है और अपनी सेवानिवृति के दिन तक अर्थात देश की लगभग दो पिढ़ीयों के जीवनकाल तक वह केवल और केवल देश की प्रतिभा, उर्जा और कीमती समय का अपव्यय करता है. वह स्वयं तो अपने पालकों को वृद्धाश्रमों में लावारिस छोड़ सकता है परंतु बाकी के समाज से यह उम्मीद करता है कि उन्हीं बूढ़े माँ बाप के पिछड़ेपन के पुरस्कार से उसे नवाजा जाये, उसके सुखी जीवन की व्यवस्था बाकी लोग करें. यही लोग असली खतरा है क्योंकि एक बार नियुक्त होने के बाद ये ही लोग देश पर शासन करते है. इनके दुष्कर्मो का इलाज किसी के पास नहीं है. इस देश को पिछड़े वर्ग के नेताओं से नहीं बल्कि इस सरकारी सेवक वर्ग से असली खतरा है क्योंकि इनकी नौकरी की शाश्वत व्यवस्था इन्हें भगवान के बाद सबसे ताकतवर शक्ति बना देती है.

आरक्षण का सारा भूत ही इसी नौकरवादी मानसिकता से जन्मा है. जो सबसे बड़ा नुकसान इस भूत ने भारतीय मानसिकता को पहुँचाया है वह है जीवन के विकास के बाकी सभी अंगों की अवहेलना. आरक्षण का विरोध करने वाले हो या समर्थन करने वाले, वे सरकारी नौकरीयों के औचित्य पर प्रश्न नहीं उठाते बल्कि वे तो सरकार नाम की यंत्रणा का अपने व्यक्तिगत विकास के लिये कितना शोषण हो सकता है, इसी की गिनती करते रहते है. कई ऐसे समाजों ने जो आजादी के पहले देश में अपने अपने पारिवारिक या जातीय व्यापारों से अपने आपको समाज की मुख्यधारा में बनाये रखा था, इस अंधी दौड़ में उन व्यापारों को बंद करके बेकार की शिक्षा और नौकरी की आस में अपने आपको तबाह कर दिया है.

१९९१ के बाद देश में जारी बाजारवाद और मुक्त अर्थव्यवस्था के कारण सरकारी विभागों में कुल कितनी नौकरियाँ पैदा हुयी और उसमें से कितनी पिछड़े वर्ग के जवानों से भरी गयी, इस बात का लेखाजोखा आज समाज को बताने की सख्त जरूरत है. वहीं दूसरी ओर नीजि उद्यमों में पिछले दो दशक में पिछड़े वर्ग के कितने जवानों को नौकरियाँ मिली है, यह भी देखा जाना चाहिये. रामविलास पासवान जैसे कुछ महाभाग तो बिक चुके सरकारी उद्यमों में भी आरक्षण की वकालत कर रहे थे. यह तो भला हो कि मंडल की जन्म भूमी बिहार ने ही पासवान के राजनीतिक इरादों की कब्र खोद दी अन्यथा वे तो सरकारी उद्यमों के बाद नीजी उद्यमों का भी सत्यानाश ही कर देते. बगैर काम के वेतन सरकार दे सकती है, व्यापारी नहीं. वहाँ तो यदि आप का काम उनका नुकसान कर रहा हो तो वे तो आपको बाहर का रास्ता बता देंगे.

आरक्षण इस देश की बहुसंख्यक जनता के सामने परोसा जा चुका लॉलीपॉप है. वो एक सनकी राजा और उसके प्रिय मिट्ठू के समान है जिसकी जान जा चुकी है किंतु किसी दरबारी में इतना सामर्थ्य नहीं है कि वह उस सनकी राजा को मिट्ठू की मौत की असलियत बताकर अपनी जान जोखिम में डाले. आज वोट बैंक की राजनीति के कारण कोई भी बहुसंख्यक वर्ग को वास्तविकता बताने की जोखिम लेने को तैयार नहीं है. आरक्षण के पक्ष या विपक्ष में नारे लगाने वाले दोनो ही वर्ग एक ही नाव की सवारी कर रहे है. किंतु एक वर्ग ऐसा भी है जो मुक्त अर्थव्यवस्था या प्रतियोगी बाजारवाद को मानने वाला है. आाज उस वर्ग का कोई प्रवक्ता संसद या देश की विधानसभाओं में नहीं है. शेतकरी संघटन के अलावा तो आज ऐसा कोई राजनैतिक मंच भी नहीं है जो जातीय अस्मिता के नजरिये से नहीं बल्कि देश की समूची उत्पादकता को आरक्षण के गलत इस्तेमाल से मिलने वाली चुनौती के नजरिये से इस प्रश्न को देखता हो.

मेरा प्रश्न यह है कि केवल हमारे ही देश में सरकारी नौकरी के प्रति इतना आकर्षण क्यों है? क्यों लोग स्वयं के उद्यम, व्यापाार या खेती बाड़ी करके अपने लिये और देश के लिये संपत्ति का सृजन नहीं करना चाहते है? क्यों लोग सरकारी कार्यालय के कारकून, पोलिस कांस्टेबल या स्कूल के शिक्षक बनने के लिये अपने बाप दादाओं के खेत खलिहान बेच बेच कर गाँव छोड़ रहे है? क्यों लोग मालकी के व्यापार के बजाये दासता को या काम के घंटों की गुलामी को प्राथमिकता दे रहे हैं? इसके पीछे कोई नैतिक आदर्श है या दूसरों की मेहनत की कीमत पर अपने लिये सुविधायें जुटाने की कामचोर मानसिकता?

इसका जवाब विश्व बैंक की एक रिपोर्ट से उजागर होता है. यह रिपोर्ट एशियाई देशों में प्रतिव्यक्ति सकल घरेलु उत्पाद की तुलना में सरकारी कर्मचारियों के वेतन का तुलनात्मक ब्यौरा पेश करती है.

| देश | अनुपात |
|---|---|
| भारत | ७ गुणा |
| द.कोरिया | ४.८ गुणा |
| थायलैंड | ४.६ गुणा |
| मलेशिया | ३.५ गुणा |
| फिलीपींस | २.६ गुणा |
| सिंगापूर | २.३ गुणा |
| पाकिस्ताान | २.१ गुणा |
| श्रीलंका | २.० गुणा |
| इंडोनेशिया | १.७ गुणा |
| बर्मा | १.६ गुणा |
| चीन | १.५ गुणा |
| वियतनाम | १.३ गुणा |

इस रिपोर्ट के तथ्य यदि सत्य है तो इस बात में कोई शक ही नहीं है कि भारत सरकार और हमारी सभी राज्य सरकारे अपने अपने कर्मचारियों के लिये गरीब जनता या उत्पादक वर्गों के शोषण से जमा रकम की तिजोरी लुटा रही है. जो पैसा राष्ट्र के विकास और संरचनागत ढाँचे के निर्माण पर खर्च होना चाहिये था, उसे वेतन और भत्तों पर लुटाया जा चुका है, लुटाया जा रहा है. जो पैसा दवाखानों के निर्माण और व्यवस्थापन में लगना चाहिये था, वह डाक्टरों पर खर्च किया जा चुका है. जो रकम देश के प्रत्येक गाँव में स्कूल कॉलेज खोलने में और विद्यार्थियों को विश्वस्तरीय शिक्षा मुहैया कराने में खर्च होनी चाहिये थी, वह केवल शिक्षकों के वेतन भत्तों पर बर्बाद कर दी गई. हमारे साम्यवादी जो कि सरकारीकरण के पक्ष में सबसे ज्यादा नारे बाजी करते रहते है, उन्होंने देखना चाहिये कि उनके सपनों का देश चीन किस तरह सरकारी कर्मचारियों के वेतन भत्तों को सख्त नियंत्रण में रखता है. क्या हमारे साम्यवादी इस गरीब देश को यह छूट देने को तैयार है? देश के सरकारी कर्मचारियों के पक्ष में झुका हमारा तंत्र उनका इतना लाड़प्यार करने के बाद उनसे किसी कामकाज की उम्मीद रखने को तैयार नहीं है. कानून बना बना कर उन्हें अजेय बनाया जा रहा है और जनता को गुलाम पशुओं से भी बदतर जीवन की ओर धकेला जा रहा है. नतीजतन आज सारे देश में प्रत्येक जाति अपनी अपनी अस्मिता की दुकान खोल कर बैठी हुयी है. देश के स्वाधिनता संग्राम के शहीदों की जातियाँ देखकर उनके बलिदानों का मुल्यांकन किया जा रहा है. संघर्ष, दृढ़ इरादे से भरी प्रतियोगिता और अनथक प्रयास जैसे शब्द हमारी जिंदगी के शब्दकोश से लुप्त होते चले जा रहे है और उनके स्थान पर अधिकार, आंदोलन, अस्मिता, उपर की कमाई, वकील और कानून जैसे शब्द रोजमर्रा की जिंदगी का हिस्सा बन चुके है. सारा देश संपत्ति का सृजन करने के बजाये, अपनी सुरक्षा और सुविधा की रक्षा के लिये नजदीक के आदमी का गला काट देने को तत्पर है. केवल और महज आजादी के बाद के छह दशकों की सरकारी नौकरी की लालसा वाली हमारी जीवन शैली नें हमारे नैतिक जीवन शैली की चूलें हिला दी है. जो देश मुगलों से लड़ते हुये नहीं हारा, जिसने अँग्रेजों को बाहर का रास्ता बताने में अपनी सारी शक्ति एकजूट होकर दाँव पर लगा दी, वही महान देश आज क्षुद्रता और दीनता को राष्ट्र का घोषवाक्य मानकर अपने पुरूषार्थ को तिलांजली दे चुका है. आज हमको निपटाने के लिये किसी बाहरी दुश्मन की जरूरत नहीं है बल्कि हम ही अपने महान गौरव के दुश्मन बन चुके है. हर जाति और उपजाति जमीन के नीचे बिछी एक लैंड माईन की तरह अपने फूटने के मौके का इंतजार कर रही है. कभी राजस्थान के गुजर फूट जाते है तो कभी विदर्भ के हलबा या गोवारी. कभी कृष्ण को पैदा करने वाली जाट जाति का आंदोलन रेल और रास्ते रोक देता है तो कहीं महाराष्ट्र के गौरव गान के लिये सारे देश को अपने घोड़े की टापों से कंपायमान करनेवाले मराठा आंदोलित हो जाते है. एक दौर के बादशाहों और सम्राटों के ये वंशज आज मानो दीनता और हीनता की यात्रा पर चल पड़े हो. जो कल तक संस्कृति के पहरेदार थे वे आज एक अदद सरकारी नौकरी की लालसा में अपने ही वैभव से भरे इतिहास से नाता तोड़ चुके है.

इसलिये आज आरक्षण के विरूद्ध आंदोलन करने के बजाये सरकारी कर्मचारियों की बेशुमार बड़ी हुयी आय के विरूद्ध आंदोलन करने की जरूरत है. एक प्रथम श्रेणी के कर्मचारी का पगार देश के प्रतिव्यक्ति सकल घरेलु उत्पाद के तीन गुना से ज्यादा और देश के द्वितीय क्षेणी के किसी भी कर्मचारी का वेतन दो गुना से ज्यादा नहीं होना चाहिये. आप सिर्फ उनके वेतन का संबंध देश के प्रतिव्यक्ति घरेलु उत्पाद से जोड़ दिजीये और फिर देखीये लोग अपनी अपनी जातीय अस्मिता को विसर्जित करके किस तरह बाप दादाओं के काम धंदों की ओर लौटने लगेंगे. किसी भी सरकारी कर्मचारी को जीवन भर के लिये देश के उत्पादक समाज के द्वारा पाला पोसा जाना जरूरी नहीं है, उसने भी तो कभी न कभी दूसरों की चिंता करनी चाहिये. अतः उनकी नौकरी की अधिकतम समय सीमा दस वर्षों की होनी चाहिये जिसमें उनके स्थानांतरण वगैर एक या दो से ज्यादा नहीं होने चाहिये ताकि वे अपने कामकाज पर ध्यान दे सकें. इन दस वर्षों में कोई भी वेतन वृद्धि इत्यादि उन्हें नहीं दी जानी चाहिये. उन्हें अपना कामकाज पूरा करने की पूरी छूट होनी चाहिये और राजनीतिक दलों के बिगड़े हुये दलाल किस्म के कार्यकर्ताओं से उनका पूरा बचाव होना चाहिये. हर तरीके से सरकारी नौकरी को ज्यादा जिम्मेदारी से भरी और तुलनात्मक रूप से कम वेतन भत्तों वाला बनाया जाना चाहिये. इस तरीके से जो सरकारी तिजोरी की बचत होगी, उससे देश में आधारभूत संरचना, स्कूल कॉलेज, दवाखाने, धर्मशालायें, समाजभवन इत्यादि खड़े किये जाने चाहिये ताकि लोगों की प्रतिभा, शिक्षा और सामाजिक सरोकारों की रक्षा हो सकें. बेरोजगारों को शून्य ब्याज की दर पर पाँच से दस वर्षों के लिये कर्ज मुहैया कराये जाने चाहिये ताकि समाज में स्वयं रोजगार के द्वारा संपत्ति का सृजन करने वाली ईमानदार प्रजाति का फिर से जन्म हो सकें.

राजनीति के क्षेत्र में पिछड़े वर्ग के नेताओं का स्वागत होना ही चाहिये. जैसा कि मैंने पहले ही कहा है, वे प्रतियोगी चुनावी व्यवस्था के रास्ते से आते है, अतः मुख्य मंच पर उनका आगमन एक राष्ट्र के रूप में हमको मजबूत ही करता है और देश में यत्र तत्र फैले जातिवाद को कम करता है. जब इथियोपिया में जन्मा एक श्याम वर्ण का ओबामा संयुक्त राज्य अमेरिका का अध्यक्ष बन सकता है तो मायावती या नरेंद्र मोदी भारत का नैतृत्व क्यों नहीं कर सकते है? निश्चित रूप से ऐसे नेता हमारे आज के जड़विहीन, लज्जाहीन और हतबल हो चुके नेताओं के मुकाबले देश को ज्यादा काबिल नेतृत्व दे सकेंगे. वे किसी श्रद्धांजली सभा के द्वारा चुने हुये न होकर देश की लोक सभा द्वारा चुने गये होंगे. वे किसी गैर जिम्मेदार राजकुमार के जिम्मेदार होने की प्रतिक्षा में टाईमपास करने वाले सरकारी अफसर न होकर देश के समय और प्रतिभा का सर्वोत्तम सदुपयोग करने वाले वास्तविक नेता होंगे.

और निश्चित रूप से ऐसे समाज किसी सिनेमा या साहित्य से डरने वाले या अस्मिता की चीख पुकार करनेवाले तो नहीं ही होंगे बल्कि इसमें कोई शक ही नहीं है कि वे नये नये नजरिये से दुनिया को देखने का माद्दा रखेंगे. वहाँ महान साहित्यकारों का साहित्य आने वाली पिढ़ीयों को नया आत्मविश्वास देगा और जीवन को जोड़नेवाली शक्तियों की पहचान करायेगा. जहाँ तर्क मुक्त होगा और बहुमत अपनी शक्ति और सामर्थ्य का उपयोग समय और स्थान की सीमा को पार करने वाली संस्कृति के निर्माण में खर्च करेगा. जहाँ हमारे भीतर की दिव्यता दूसरों की दीनता और हीनता को उपर उठने के लिये प्रेरित करेगी. वह निर्णायक रूप से एक ऐसा राष्ट्र होगा, जहाँ मनुष्यता अपनी प्रतिभा, कला और भावनाओं की चरम उँचाईयों को छुयेगी. तब हम सही अर्थों में कह सकेंगे कि

भारत मेरा देश है, सभी भारतीय मेरे भाई बहन है. मुझे अपने देश से प्यार है और इसकी समृद्ध विरासत पर गर्व है. जय हिंद.

**- ॲड. दिनेश शर्मा**
पुलगाँव, जि. वर्धा महाराष्ट्र.
मो. ९३२६८४१९२४
dgsharma07@gmail.com

■■

# असला कापूस, नकोच लाजूस



**स्वार्थातूनच आम्ही मंडळी तुम्हाला परमार्थदर्शन घडवतो. धार्मिक बाबा, राजकीय बाबा, सामाजिक बाबा, व्यावसायिक बाबा या वेगवेगळ्या कॅटगरितील आम्ही बाबा मंडळी आहोत. आम्ही म्हणजे 'विचारी ढेकणं!' ढेकूण कसा माणूस न मारता त्याचे रक्त प्राशन करतो, पुन्हा-पुन्हा नियमितपणे त्याच्या बेसावध अवस्थेत त्याचे रक्त शोषण करतो. त्याला मरगळलेले ठेवतो, त्याच्यातील बंडखोरी निपचीत करवतो तसेच हे आहे. तुम्ही मंडळींनी सरत-सरत जगायचे आणि आम्ही मंडळींनी तुम्हा सरवत-सरवत फुगायचे. हे अनादी काळापासून घडत आलेले आहे.**

**उगीच झाला चांगला पाऊस**
**उरला म्हणती बराच कापूस**
**प्रिये नको तू यंदा लाजूस**
**चल, होत आता दूर बाजूस !**

भक्तांनो, थोडा तुमच्या स्मरणशक्तीला ताण द्या तेव्हा हे लक्षात येईल की गेल्यावर्षी आठ हजार रूपये क्विंटल या भावापर्यंत गेलेला कापूस शेवटी-शेवटी दोन हजार रूपये क्विंटलपर्यंत येऊन थांबला होता. ज्यांचा कापसू उशीरा मार्केटला गेला त्यांना उरलेल्या कापसामुळे आपल्या घरधनीणीला वरिल ओळी ऐकवाव्या लागल्य ाहोत्या. हे ऐकवणे आम्ही ऐकला होते ते एका शेतकऱ्याच्या घराच्या भिंतीजवळ उभे होतो तेव्हा ! आता, आम्ही पडलो महाराज मंडळी. आमचे काय असते बघा की. रान पिको किंवा कोणी रान विको, त्याच्यातली भक्ती मात्र जागी राहते आणि आम्हाला दक्षिणा मिळत राहते आणि आम्ही सोकावतो. आता गेल्यावर्षीचेच पुन्हा आठवले तर एक लक्षात येईल की तेव्हा तीन-साडेतीनशे लाख टन कापसाच्या गाठी शिल्लक राहिल्या होत्या. त्या गाठी आता पाठीशी आहेत आणि यंदाच्या पिकणाऱ्या गाठी दाराशी आहेत तेव्हा यंदाही कोणता भाव फुटू शकेल याचा अंदाज आम्हाला असल्याने आम्ही सरळ-सरळ ''महाराज तुमच्या गावात'' ही स्कीम सुरू करीत असून या स्कीमअंतर्गत आम्ही जिथे स्ट्रॉबेरी पिकतात अश्या महाबळेश्वर, पाचगणी या भागात आमचा टेंपररी आशिर्वाद दरबार सुरू करणार आहोत. या दरबाराच्या लॉंचिंगपूर्वी ''बाबा ऑन माऊंट'' ही थीम आम्ही हळूहळू इव्हेंट मॅनेजमेंटवाल्यांकडून साऱ्यांच्या मनात सोडू, यात कोणी शंका बाळगू नये. खरेतर आताचे वर्ष शेतकऱ्यांना हे सांगते आहे, इशारा देत आहे. सूचवत आहे की हे वर्ष डिमेन्शीयाचे आहे. हा डिमेन्शिया काय आहे? हा आजार आहे. हा आजार म्हणजे मेंदूच्या स्मरणातले सारे स्मरण अर्थात स्मृती अर्थात आठवणी नष्ट होणे. नष्ट नाही झाल्या तर विसरणे. यालाच स्मृतीभंष असेही म्हणतात. या आजाराचा वापर करून महान क्रीडा संयोजक तथा कर्नाटकभूषण तथा राजकीय बाबा के. सुरेश यांची सारी स्मृती त्या तिहार जेलमध्ये हरवली आहे. या आजाराला मानसिक आजार म्हणून व्हेरी इंम्पोर्टंट दर्जा मिळाल्याने त्यांना आता अधिकृतपणे तिहार जेलमधील ही आजरपेरणी आटोपल्यावर या आजारपिकाची काळजी घेण्यासाठी पुन्हा पुण्याच्या येरवडानामक मनोरूग्णालयाच्या शिवारात पाठवले जाईल याची खात्री आहे. हे पीक मात्र काही वर्षे कापणीला येईल असे वाटत नाही तर या पीकाचे कापसासारखे भाव कोसळण्याचीही भिती नाही. हा खरा आदर्श शेतकरी मानला पाहिजे. या शेतकऱ्याचे अनुकरण यंदा साऱ्या सच्च्या शेतकऱ्यांनी केले पाहिजे. ज्या



**शे.भ.प.** शेती भक्त परायण)
**-'थंडा' महाराज देगलूरकर**



मंडळीचे हातउसने म्हणून पैसे घेतले आहेत त्यांचे पैसे परत देण्याची ऐपत जर या कापसाच्या भावासारख्या इतर पिकांनी आणण्याची शक्यता वाटली आणि कापसामुळेही आली तर तमाम साऱ्या शेतकऱ्यांना ''डिमेन्शीया'' झाला आहे हे सिद्ध करून टाकू. एखाद्याला जर देणारा धनको भेटला तर त्याला हा डायलॉग मारा की, आजवर आम्ही कोणाची उधारी फेडली आहे मग तुझी देणार आहोत ! हे कृषीवाक्य ऐकून तो धनको सुद्धा शेतीकर्माला लागेल आणि आपली फॅनमेल वाढेल हा तरी फायदा होईल. हा फायदा होवो अथवा न होवा`आम्हाला मात्र मराठवाडा, विदर्भ हा प्रदेश मात्र ताबडतोब सोडायचा आहे कारण या दोन्ही प्रदेशात इतके कापूसवेड आहे की गेली दोन दशके प्लेगच्या साथीसारखी इकडे कापूस पीकाचाच प्लेग येताना आम्ही पाहात आलो आहोत. या प्लेगमुळे शेतकऱ्याची पोरं अशा कविता लिहितात की,

**तुमची जाते थंडी,**
**आमची फाटते बंडी**
**आमचे घसे कोरडे,**
**तुमच्या प्याल्यात ब्रांडी ।**

या अशा कविता ऐकण्यापेक्षा आम्ही त्या महाबळेश्वरला तोकड्या वस्त्रातल्या मुंबईनिवासी भक्तिणींचा मेळावा घेऊन सुखदर्शनाचा आनंद घेणार आहोत. हे आधीच आम्ही तुम्हाला का सांगतो आहोत तर याचे कारण असे आहे की दारिद्र्याशी संग अन् भुकेशी गाठ हे घडणे आम्हालानको आहे. हे नको असले तरी आम्ही ज्या मातीतून पुढे आलो आहोत त्या मातीशी निष्ठा ठेवणाऱ्या कृषकांना सावध करणे हे आमचे स्वार्थी कर्तव्य बनते. या स्वार्थातूनच आम्ही मंडळी तुम्हाला परमार्थदर्शन घडवतो. धार्मिक बाबा, राजकीय बाबा, सामाजिक बाबा, व्यावसायिक बाबा या वेगवेगळ्या कॅटगरितील आम्ही बाबा मंडळी आहोत. आम्ही म्हणजे 'विचारी ढेकणं!' ढेकूण कसा माणूस न मारता त्याचे रक्त प्राशन करतो, पुन्हा-पुन्हा नियमितपणे त्याच्या बेसावध अवस्थेत त्याचे रक्त शोषण करूतो. त्याला मरगळलेले ठेवतो, त्याच्यातील बंडखोरी निपचीत करवतो तसेच हे आहे. तुम्ही मंडळींनी सरत-सरत जगायचे आणि आम्ही मंडळींनी तुम्हा सरवत-सरवत फुगायचे. हे अनादि काळापासून घडत आलेले आहे त्यामुळे ज्यांनी कापूस लावलेला आहे त्यांनी किमान एखाद्या एकरात, गुंठ्यात, बांधावर, धुऱ्यावर काहीतरी हटके लावावे म्हणजे तुमचे सरणे आणखी एक वर्ष लांबेल आणि आमचे फुगणे कायम राहिल. हे सगळे असले तरी दुसरीकडे मुंबईत बॉम्ब फुटले तरी हरकत नाही किंवा जाल्याजवळ वीस-पंचवीस वारकरी चिरडले तरी दुःख नाही कारण सध्या संपूर्ण भारतात सर्वात मोठी समस्या आहे ती ऐश्वर्याला काय अपत्य होणार आहे या कुतूहलाची. अगदी वाझोंटीबाईसुद्धा स्वतःचे वाझपण विसरून ऐश्वर्याला जे काही होईल ते अव्यंग होऊ दे असा नवस मागते आहे म्हणजे कारण तिला भिती आहे की ऐश्वर्याला जर दुर्दैवाने अमिताभच्या त्या पिक्चरमधले 'पा' सारखे बाळ झाले तर कसे होईल ? तूर्त एवढा विचार करा आणि म्हणा की,

**काहीही जरी उगवले तरी डिमेन्शीयाची साथ आहे**
**ईसार म्हणून घेतलेल्याची मनात थोडीच याद आहे ?**

**- शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**
**मु. पो.** thandamaharaj@gmail.com
टेम्परसी टूजी कार्ड संपर्क क्र. ९४२१८३९६६९

■■

**स्वातंत्र्य का नासले?... पान १३ वरून पुढे**

५० वर्षांत देशावर अनर्थ कोसळला.' गांधींच्या चेल्यांनीच त्यांचा कसा पराभव केला हे येथे सांगितले आहे. स्वातंत्र्य आले ते जोतिबा फुल्यांच्या भाकिताप्रमाणे पेशवाईचे नवे रूप घेऊन. गोऱ्या इंग्रजांची जागा काळ्या इंग्रजांनी घेतली. गांधीवादी ग्रामीण अर्थव्यवस्था त्यांना परवडणारी नव्हती. याउलट समाजवादाच्या नावाखाली सर्व सत्ता आपल्या हाती घेण्याची शक्यता दिसताच आंग्लाळलेल्या काँग्रेसनेच गांधी नेतृत्वाचा मुखवटा सहज फेकून दिला. स्वातंत्र्यानंतर लगेच देशाचे काळे आणि गोरे इंग्रज असे विभाजन झाले. हा शेतकरी संघटनेचा जगप्रसिद्ध विचार येथे सांगितला आहे.

समान नागरी कायदा देशात आला पाहिजे अशी एक भाबडी आशा बहुतेक हिंदूंच्या मनात असते, त्यात छुपा मुस्लिमविरोधच दडलेला असतो. यावर शरद जोशी लिहितात- सर्व देशात एक समान नागरी कायदा असावा या कल्पनेमागे राजकीय शासन संस्थेचे प्रभूत्व प्रस्थापित करण्याची बुद्धी होती. या मुद्द्यावर समाजवादी नेहरू, समाजसूधारक आंबेडकर एवढेच नव्हे तर सनातनी हिंदू मंडळींचेही एकमत होते. समान नागरी कायद्याने मुसलमानांच्या नाकावर टिचून शरीयत सोडून राष्ट्रीय कायदा स्वीकारणे भाग पडेल, अशी सनातनी हिंदू मंडळींची योजना होती. त्यांच्या मनातील अंतःस्थ हेतूच येथे उघड करण्यात आला आहे. घटना तयार करताना फार बारीकसारीक बाबींचा आणि देशातील सर्व सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, जातीय समस्यांचा विचार करण्यात आला; परंतु आर्थिक विचारांना फारसे स्थान देण्यात आले नाही. शेती संबंधी एकच कलम ४८ आहे. त्यातील मार्गदर्शक तत्त्व काय तर, शासन शेती आणि पशुसंवर्धन आधुनिक आणि शास्त्रीय पायावर उभे करेल आणि पशुसंवर्धन, विकसन तसेच गायी, कालवडी आणि इतर दुभत्या वा भाकड जनावरांच्या हत्येस बंदी घालेल एवढाच उल्लेख असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. घटना समितीत बसलेल्यांना शेतीचा विकास आणि शेतीच्या मूलाधाराने सर्व अर्थव्यवस्थेचा विकास अशी काही संकल्पना असल्याचे दिसत नाही. सवर्ण हिंदू मनाचा गो रक्षणाचा आग्रह काय तो स्पष्ट होतो असे म्हटले आहे.

आपला देश इंग्लंड अमेरिकेसारखा संपन्न व्हावा याविषयी देखिल आम सहमती नव्हती. गरिबीचे तत्त्वज्ञान ज्याच्या त्याच्या तोंडी खेळत होते. हाती पैसा येत असेल, तर हपापा गिळल्याशिवाय सोडण्याचा निःसंग वैरागी कोणीच नव्हता, आपली पोळी भाजून घ्यावी, आपल्या माणसांचे भले करावे आणि साऱ्या जगाला मात्र वैराग्य आणि संयम आणि साधेपणा यांचा बडेजाव सांगावा अशी नीतीमत्ता रूढ होती. महात्मा गांधींच्या नेतृत्वाच्या काळातसुद्धा आर्थिक संपन्नतेला ध्येय म्हणून सर्वमान्यता तर नव्हतीच; पण श्रीमंतीचा राग असल्याचा एक देखावा तरी होता, शेतकऱ्याने दिवसभर कष्ट करावे आणि त्या कष्टाचे फळ, मुलाबाळांसह परमेश्वराच्या भजनात आनंदाने उपभोगावे, अशी भाबडी सामाजिक मान्यता होती. आज देशातील भ्रष्टाचाराची प्रकरणे पाहिल्यानंतर त्यावेळच्या काळाचे शरद जोशींनी केलेले विवेचन किती तंतोतंत लागू पडते हे मंत्र्यांचे, खासदारांचे भ्रष्टाचार, सत्यसाईबाबा, पद्मनाभमचे मंदिर येथे सापडलेले खजिने यांचा विचार करता स्वातंत्र्याच्या नंतरच्या सामाजिक परिस्थितीचे विवेचन अगदी योग्य असल्याचे पटते.

१५ ऑगस्ट १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले तरीपण समाजवादाच्या स्वीकारामुळे देशाने स्वतंत्रता गमावली. समाजवादाच्या नावाखाली देशात जरी लोकशाही, प्रौढ मतदान पद्धती हे सर्व असले तरी शेवटी एकदा मतदान संपले की सर्व सत्ता ही सरकारच्या हाती कशी जाते? हेही स्पष्ट केलेले आहे.

जी लोकशाही आपण स्वीकारली आहे, त्यामध्ये सर्वांनाच मतदानाचा हक्क असल्यामुळे मतदार संघातील हिंदूंच्या बहुसंख्येमुळे देशातील धार्मिक, सांस्कृतिक, जातीय विविधतेला अजिबात थारा राहत नाही. ही सवर्णांच्या सोयीची लोकशाही आहे. आता कुठे आपण हळूहळू मागासवर्गीयांना आणि स्त्रियांना सत्तेत जाता येईल अशी व्यवस्था करीत आहोत. शेतकरी संघटनेने मात्र २५ वर्षांपूर्वीच स्त्रियांना स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये ५०च काय १०० टक्के आरक्षण असावे अशी मागणी केली. देश स्वतंत्र झाला तरी उद्योगांना अतिरिक्त भांडवलाचा पुरवठा व्हावा यासाठी शेतीचे शोषण आणि तेही अजिबात काहीही कळू न देता समाजवादाच्या नावाने लादण्यात आले आणि देशाची भारत आणि इंडिया अशी दुसरी विभागणी झाली. पहिली विभागणी ही भारत, पाकिस्तान अशी होती. ही दुसरी फाळणी त्यापेक्षाही भयानक आहे. देशातील कारखानदारी ही चैत्रगौरीची कारखानदारी आहे, असे शरद जोशींनी म्हटले आहे. चैत्रगौरीच्या सजावटीसाठी खेळणी आणि बाहुल्या मांडाव्यात त्याप्रमाणे सरकारच्या मदतीने आणि सबसिडी मिळवून जेवढे काही कसब दाखवता येईल, ते म्हणजे कारखानदारी. १९९१ नंतर ही चैत्रगौरीची सजावट ढासळली. जागतिकीकरणामध्ये सर्वच उघडे पडले आणि आता पुन्हा स्वतःलाच लढाई लढावी लागेल, यासाठी काहींनी स्वदेशीचा नारा सुरू केला आहे. आम्हीच समर्थ होऊ, प्रयत्न करू असे कोणीही म्हणत नाहीत. एकदा तरी उडी टाकूच भले नाकातोंडात पाणी जाऊ द्या; पण स्वतंत्रपणे हातपाय हलवू, काही निर्मिती करू एवढी ताकद आणि ऊर्मी समाजवादाच्या कुबड्या घेणाऱ्या उद्योगांकडे अजूनही तयार झालेली नाही.

स्वातंत्र्यानंतर विकासाची आगगाडी, रूळावरून घसरली आहे. देशात ब्रिटीशांनी जेवढे लोहमार्ग तयार केले. त्यानंतर ५० वर्षांत त्यात ५० किलोमीटरपेक्षा जास्त वाढ आपण करू शकलो नाही. सगळा भर रस्ते वाहतुकीवर देण्यात आला आहे. त्यातूनच तेलाचे परावलंबीत्व, पर्यावरणाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत; पण अजूनही आपण झापडबंदपणेच जगतो आहोत.

'सुरक्षा व्यवस्थेतही 'अंग्रेजीयतच' राहिली आहे'

इंग्रजांनी घालून दिलेल्या आणि त्यांनी त्यांच्या सुरक्षिततेसाठी वापरल्या जाणाऱ्या सुरक्षेच्या मानदंडानुसारच सगळी लष्करी आणि पोलिसी व्यवस्था आजही शिल्लक आहे. अतिरेक्यांचा धुमाकूळ, सीमेवरील कारवाया, जातीयवाद्यांचा आणि धर्मवाद्यांचा उच्छाद, यांचा बिमोड होणे अशक्य आहे. वारंवार होणारे अतिरेक्यांचे हल्ले हे त्यातूनच घडत आहेत.

शरद जोशींनी सुवर्णमहोत्सवी वर्षाला लिहिलेले ५० वर्षांचा जमाखर्च मांडणारे 'स्वातंत्र्य का नासले?' हे पुस्तक १४ वर्षांनंतरही देशाच्या सामाजिक, आर्थिक व्यवहारात केलेल्या अक्षम्य चुका दाखवते आणि त्यांचे उपायही सुचवते.

**ज्ञानेश्वर शेलार**

मो. ९२२६७९७०१८

■■

# शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्ष संयुक्त कार्यकारिणी बैठक वृत्तांत




जुलैच्या २९ आणि ३० तारखांना नगरच्या लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाच्या कार्यकारिणीची संयुक्त बैठक संपन्न झाली. शरद जोशींनी वर्षभरासाठी रजा घेतली. त्यांच्या गैरहजेरीत उपस्थिती कशी राहील अशी शंका अनेकांना वाटत होती; पण रावेरीचा मेळावा आणि त्यानंतर झालेल्या सर्व बैठकांना आणि कार्यक्रमांना कार्यकर्त्यांनी लक्षणीय उपस्थिती नोंदवली आणि शरद जोशी यांनी दिलेल्या विचारावर आपली निष्ठा प्रकट केली. संघटना म्हणजे एक खांबी तंबू असं म्हणणाऱ्यांना कार्यकर्त्यांनी दाखवून दिलं, की शरद जोशी म्हणजे संघटनेची शक्ती आहे हे खरं; पण कार्यकर्त्यांसाठी शरद जोशी यांनी दिलेला विचार हीच खरी शक्ती आहे. त्यामुळे शरद जोशी यांच्या अनुपस्थितीतही भरपूर कार्यकर्त्यांच्या गर्दीत ही बैठक ही संपन्न झाली.

या बैठकीपुढे चर्चेसाठी जे विषय ठेवण्यात आले होते त्यांचं विवरण २९ जुलैच्या संघटकमध्ये दिलेलं होतं. तो अंक काही लोकांना वेळेवर मिळू न शकल्याने ज्यांना येता आलं नाही त्यांना चुटपूट लागून राहिली; पण ज्यांना बैठकीच्या तारखा कळल्या ते तयारी करून आले आणि विशेष म्हणजे बहुतेक सर्व उपस्थित कार्यकर्त्यांनी हिरीरीने चर्चेत सहभाग नोंदवला.

बैठकीला सुरुवात करताना संघटनेचे अध्यक्ष रवि देवांग आणि स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष वामनराव चटप यांनी प्रास्ताविक केलं. त्यानंतर सभेपुढ चर्चेसाठी असलेल्या विषयाचं वाचन केलं. याप्रसंगी शेतकरी संघटनेनं ९ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर या कालावधीत जिल्ह्या जिल्ह्यातून साने गुरुजी संदेश यात्रेचं आयोजन करावं आणि शेतकऱ्यांवर होणाऱ्या विविध रूपी अन्यायाचं स्वरूप सर्वांच्या निदर्शनास आणून द्यावं आणि नवीन लढ्याच पायाभरणी करावी असं आवाहन करण्यात आलं. साने गुरुजींनी 'आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान' केलेलं हे आवाहन गावोगाव पोहोचण्यासाठी ही सानेगुरुजी संदेश यात्रा!

आज भ्रष्टाचाराने अक्राळविक्राळ स्वरूप धारण केलेलं आहे आणि त्याच्या झपाट्यातून शिखरावरची माणसंही सुटलेली नाहीत आणि या साऱ्या तुफानात शेतकरी मात्र हीन दीन झालेला आहे. त्याच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला कुणी तयार नाही. तेव्हा या भ्रष्टाचाराच्या तुफानातून शेतकऱ्याला वाचवण्यासाठी आणि शासनानं त्याच्या मालाभोवती घातलेल्या जीवघेण्या बंधनापासून त्याला मुक्त करण्यासाठी नवीन आंदोलन छेडायचं आवाहन करण्यात आलंय. त्यासाठी परत साने गुरुजींचं आवाहन-

'कोटी कोटी किसानांचा फणा करी शेष!'

लोकांपुढे ठेवण्यात आलं. या भ्रष्टाचाराविरुद्ध लढ्यात समविचारी लोकांबरोबर हातमिळवणी करता येईल का या विषयीही सांगोपांग चर्चा करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे कर्जमुक्तीचा प्रश्न. या प्रश्नावर या विषयाची खास अभ्यास करून मांडणी करण्यात आली होती. आतापर्यंत केलेल्या आंदोलनात जेल, कोर्टाच्या चकरा अशा हालअपेष्टा कार्यकर्त्यांना सहन कराव्या लागल्या होत्या. हे आंदोलन मात्र बांधावर बसून करावं असं ठरलं. त्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आणि सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांच्याकडे हजारो शेतकऱ्यांनी अर्ज भरून तक्रार नोंदवावी असं आवाहन करण्यात आलं. पहिल्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्यातून किमान एक हजार फॉर्म्स भरून घ्यावेत आणि आवश्यकतेनुसार यात भरही घालायचं ठरवलं. या साऱ्या अर्जांच्या याद्या संकलित करण्यात याव्यात आणि अर्जाचे गठ्ठे घेऊन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आणि सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश यांची पूर्व परवानगी

# संयुक्त कार्यकारिणी बैठकीमध्ये जाहीर झालेल्या नवीन नेमणुका

## शेतकरी संघटना

महिला आघाडी अध्यक्षा : **सौ. शैलाताई देशपांडे**
युवा आघाडी अध्यक्ष : **श्री. संजय कोले**
पुणे जिल्हाध्यक्ष : **श्री. आबासाहेब ताकवने**
सातारा जिल्हाध्यक्ष : **श्री. बाळासाहेब चव्हाण**

## शेतकरी संघटना बळिराज्य प्रमुख

पश्चिम महाराष्ट्र : **श्री. अनिल चव्हाण**
सांगली, सातारा, कोल्हापूर करिता : **श्री. ज्ञानदेव सकुंडे**
पुणे, नगर आणि सोलापूर करिता : **श्री. राजेंद्र लोंढे**

## स्वतंत्र भारत पक्ष

महिला आघाडी अध्यक्षा : **सौ. सरोजताई काशीकर**
पुणे जिल्हा अध्यक्ष : **श्री. धनाजी धुमाळ**
सातारा जिल्हाअध्यक्ष : **श्री. ज्ञानदेव कदम**
नगर जिल्हाध्यक्ष : **श्री. विक्रम शेळके**
नाशिक जिल्हाध्यक्ष : **श्री. शंकर पूरकर**
याशिवाय यांची नेमणूक करण्यात आली.

शेतकरी संघटनेच्या राज्य कार्यकारिणी
धुळे जिल्हा प्रतिनिधी : **श्री. गुलाबसिंग सुर्यवंशी**


**सौ. सरोजताई काशीकर**


**श्री. संजय कोले**


**श्री. धनाजी धुमाळ**


**श्री. शंकर पूरकर**

घेऊन प्रतिनिधी मंडळाने भेट घ्यावी आणि बँकांनी केलेल्या अवैध वसुलीबद्दल त्यांच्याकडे दाद मागावी, तसेच या अवैध वसुलीला न्यायालयांचाही हातभार लागलेला असल्यामुळे सरन्यायाधीशांकडे त्या संदभात मागणी करावी आणि ही मागणी हिला जनहित याचिका समजून न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी करावी, असाही निर्णय करण्यात आला. अर्जाचं हे वाटप याच महिन्यात करण्यात यावं, असाही निर्णय झाला. या मोहिमेला कर्जमुक्ती आंदेलन टप्पा तीन म्हणून संबोधण्यात येईल, यापूर्वीच्या दोन्ही टप्प्यांचा आढावा या वेळी घेण्यात आला.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढणाऱ्यांच्या हातचं हुकमी हत्यार म्हणजे 'शेतकरी संघटक' हे पाक्षिक. या पाक्षिकाला आर्थिक पाठबळ देण्यासाठी व्यापक प्रमाणावर वर्गणीदारांची नोंदणी करण्याची मोहीम राबवण्याचा निर्णयही याच बैठकीत झाला.

विषयपत्रिकेवर प्रस्तावित भूसंपादनाचा कायदा हा आणखी एक महत्त्वाचा विषय होता; पण या चर्चेला काही मर्यादा पडल्या होत्या. या बिलाचा मसुदा चर्चेवेळी उपलब्ध नव्हता, तेव्हा वृत्तपत्रातून आलेल्या बातम्यांवरून काही प्रमाणात चर्चा झाली. या प्रश्नावर शेतकऱ्यांच्या भावना तीव्र होत्या हे मात्र तेवढ्यावरून जाणवलं. या विषयावर मसुदा मिळवून व्यापक चर्चा व्हावी असा निर्णय झाला.

याच बैठकीत पदाधिकाऱ्यांबाबत काही निर्णय जाहीर करण्यात आले. अनेक पदाधिकाऱ्यांनी पदमुक्त करण्याची विनंती केलेली होती त्यामुळे त्यांचे विनंतीवरून त्यांना पदमुक्त करून नवीन नेमणुका करण्यात आल्या. त्यासंबंधी माहिती या सोबतच्या चौकटीत देण्यात आली आहे.

साखर कारखान्यांच्या संदर्भात आणि एकूणच सहकार चळवळीसंदर्भात एका व्यापक परिषदेचं आयोजन करण्यात यावं असा निर्णय झाला आणि त्यासाठी शेतकरी युवा आघाडीचे नवनियुक्त अध्यक्ष संजय कोले यांनी सातारा या ठिकाणी येत्या २४ तारखेला ही परिषद आयोजित करण्याची जबाबदारी स्वीकारली.

एकूणच ही बैठक सखोल चर्चेत संपन्न झाली. २९ ला दुपारी एक वाजता सुरू झालेली ही बैठक ३० तारखेला दुपारी दीड वाजता समाप्त झाली.

■■

## शेतकरी संघटक स्थिर निधी



**श्री. धनाजी धुमाळ रु. १०००**
*मु. सोनवडी, ता. दौंड. जि. पुणे.*

यापूर्वी जमा निधी रु. ६१,२००
स्थिर निधी एकूण रक्कम =रु. ६२,२००

सर्व देणगीदारांचे मन:पूर्वक आभार.
स्थिर निधीसाठी जास्तीत जास्त साहाय्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**-कार्यकारी संपादक**

शेतकरी
महिला आघाडी

# साने गुरुजी संदेशयात्रा

शेतकरी संघटना

**दि. ९ ऑगस्ट २०११ (क्रांतीदिन) ते ३ सप्टेंबर २०११**

*दि. २९, ३० जुलै रोजी नगर येथील संयुक्त कार्यकारिणी बैठकीत प्रसिद्धीस देण्यात आलेले पत्रक*

## लुटारूंच्या आता थांबवू या मौजा । कोटी किसानांचा फणा करी शेष

शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या तिसऱ्या टप्प्याच्या प्रचाराचा मुख्य उद्देश घेऊन शेतकरी संघटना येत्या ९ ऑगस्ट (क्रांतिदिन) पासून ३ सप्टेंबरपर्यंत साने गुरुजी संदेश यात्रा काढीत आहे.

यापूर्वी शेतकरी संघटनेने काढलेल्या पहिल्या टप्प्यातील आंदोलनातल्या सरसकट शेतकऱ्यांना १०,०००/- रुपयांची कर्ज माफी मिळाली. दुसऱ्या टप्प्यातल्या आंदोलनामुळे ७२ हजार कोटींची योजना शासनाने जाहीर तर केली; पण तिचा लाभ मराठवाड्यातील आणि विदर्भातील अनुक्रमे ८५ टक्के आणि ८० टक्के शेतकऱ्यांना मिळाला नाही. त्यामुळे ही योजना शेतकऱ्यांसाठी नव्हती तर पतपेढी आणि सोसयट्यांसाठी असे चित्र तयार झाले. याचा लाभ शेतकऱ्यांना न मिळण्याचं एक कारण म्हणजे शासनाचं परिस्थितीचं योग्य आकलन न करण्याचं धोरण हे आहे. एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये शेती खाते फोड न होता आजोबा आणि वडील यांच्या नावे राहिली आणि प्रत्यक्षातले वारसदार वंचित राहिले.

गेल्या दहा वर्षांत लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या हे सरकारन मान्य करते; पण त्या ज्या कारणामुळे होतात त्याकडे मात्र पद्धतशीर दुर्लक्ष करते, त्यामुळे या आत्महत्यांचं सत्र आणखीही चालू आहे. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचं मूळ आहे शेतीमालाला मिळत नसेलेल्या रास्त भावात. यालाही कारण परत शासकीय धोरणच आहे. साखर, कापूस, कांदा या पिकांना निर्यातबंदी घातल्याने भाव कोसळतात. यावर्षी कापूस खरेदी मोकळी होती तेव्हा ८००० रुपयांपर्यंत भाव गेले. सरकारने निर्यातबंदी घातली आणि भाव २००० रुपयांपर्यंत कोसळले. तिच कथा कांद्याची, उसाची.

शेतकऱ्यांची लूट इथेच थांबत नाही. कॅग (कंट्रोलर आणि ऑडीटर जनरल ऑफ इंडिया) यांच्या ताज्या अहवालाप्रमाणे राज्य शासनाने सुचविलेल्या हमीभावापेक्षा केंद्र सरकारने ठरविलेली आधारभूत किंमत ही सरासरी ४७% कमी आहे. राज्य शासनाने सुचविलेले भाव हेच मुळात वस्तुस्थितीपेक्षा कमी आहेत. शेतीमालासंदर्भात शासनाने नियुक्त केलेल्या स्वामीनाथन यांच्या अहवालात हमी भावात नफा म्हणून ५०% वाढ द्यावी असे सुचवले असूनही शासन ही वाढ देत नाही. नगर जिल्ह्याचे कृषी मंत्री मा. ना. बाळासाहेब थोरात यांनीही एका लक्षवेधीला विधानसभेत उत्तर देताना हे प्रांजळपणे मान्य केले आहे, की केंद्र सरकारने ठरवलेली आधारभूत किमतीपेक्षा महाराष्ट्रात वेगवेगळ्या पिकांचा उत्पादन खर्च जास्त आहे. अशा परिस्थितीत शेती आतबट्ट्याची होणार नसेल तर काय? आणि शेतकरी आत्महत्या करणार नसतील तर काय? शेतकऱ्यांबाबतचा दुजाभावचं ढळढळीत उदाहरण म्हणजे कॉर्पोरेट सेक्टरवर होणारा सूट-सवलतींचा वर्षाव गेल्या सहा वर्षांत सेक्टरला एक्साईज ड्युटी, टर्नओव्हर टॅक्स, इंपोर्ट ड्युटी, कस्टम ड्युटी, इन्कम टॅक्स इत्यादी रूपाने २१ लाख कोटींची सवलत दिली आहे. मात्र शेतकऱ्यांच्या गळ्याभोवतीची निर्यातबंदी आणि अपुरा हमीभाव यांचा फास कमी करण्याचा विचारही करीत नाही. अशा परिस्थितीत शेतकरी जगणार कसा?

शिवाय त्यांच्या डोईवरचे कर्ज अवैध कसे आहे हे तर सुप्रिम कोर्टाने बँक ऑफ इंडिया विरुद्ध करणम रंगाराव या ऐतिहासिक निकालात स्पष्ट केले आहे. त्यात रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकाचाही उल्लेख आणि चर्चा आहे. (अपिल क्रमांक ५४४/१९८६) निका दि. २०/६/१९९४) जनहित याचिका १६४/२००४ खंडपीठ औरंगाबाद दि. ५/५/०६ आणि कॅग अहवाल २००७ प्रकरण २ व ३ कनक्लूजन कॅग ३-७ या निकालांनी स्पष्ट केले आहे.

या पार्श्वभूमीवर आम्ही हे कर्जमुक्ती आंदोलन करीत आहोत. साने गुरुजींनी शेतकऱ्यांच्या अवस्थेची कणव आली. म्हणून आत्महत्या केली. त्यांनी 'आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान' हा संदेश दिला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर शेतकरी संघटनेने त्यांचा 'पेटवू सारे रान, उठवू सारे रान'चा वसा पुढे चालवला आहे. हा शेतकरी पेटून उठला आहे आणि साने गुरुजींच्या शब्दात परत सांगायचं झालं तर

'लुटारूंच्या आता थांबवूया फौजा
कोटी कोटी शेतकऱ्यांचा फणा करी शेष'

■■

# अंतिम दर न देणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करा

## शेतकरी संघटनेची साखर सहसंचालकांकडे मागणी

## शेतकरी संघटनेचा साखर सहसंचालक कार्यावर मोर्चा



कोल्हापूर : शीतल राजोबा यांजकडून

उसाचे अंतिम बिल व पहिला हप्ता न देणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करावी, ही मागणी करत आज शेतकरी संघटनेने साखर सहसंचालक कार्यालयावर मोर्चा काढला.

कारखान्यांनी २००९-१० या हंगामात गळितास आलेल्या उसाचे अंतिम बिल अद्याप दिलेले नाही; पण साखर आयुक्तांनी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप शेतकरी संघटनेचे विभागप्रमुख संजय कोले यांनी केला. अनेक कारखान्यांनी अंतिम बिले दिली; पण त्यातून ठेवी, भागविकास निधी, विश्वस्त संस्थांसाठीचा निधी शेतकऱ्यांच्या सहमतीशिवाय कपात केला आहे. हा अन्याय असून याबद्दल संबंधित कारखान्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. चौदा दिवसांत पहिली उचल देणे बंधनकारक असताना अनेक कारखान्यांनी अद्यापही पैसे दिलेले नाहीत. ही बाब निदर्शनास आणून देत कारखानदारांच्या चोरीला कायदेशीर बळ देण्याचे काम साखर विभाग करत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

अनेक कारखान्यांचा साखर उतारा चांगला आहे; पण त्यांनी दर कमी दिल्याचे सांगत शाहू कागलचा १२.११ साखर उतारा असताना २७२७ रुपये, तर उशिरा तुटणाऱ्या उसाला तीन हजार रुपये अंतिम दर दिला. मग दत्त- शिरोळचा १२.३७ उतारा असताना तेवढा दर देण्यात काय अडचण कोणती? असा थेट सवाल करत, पैसे घेऊन कारखान्यांच्या प्रस्तावावर सह्या केल्या जातात, असा घणाघाती आरोपही त्यांनी केला.

२००८ साली कर्जे काढून ऊस लावले. कारखान्यांनी हंगाम चालू होण्याअगोदर अंतिम बिल सप्टेंबर २०१० ला जाहीर करणे आवश्यक होते. चालू हंगामात पुन्हा सप्टेंबर जवळ आला तरीही आपण शेतकऱ्यांना पैसे वेळेत देण्याचे आदेश देत नाही. याचा अर्थ आपण फक्त कारखानदारी चालवणाऱ्यांच्या फायद्यासाठी काम करता काय? असे संजय कोले यांनी सुनावले. खरे तर साखरेला क्विंटलमागे चार हजाराहून जादा दर मिळाला आहे. बगॅस व मोलॅसिसला ४५०० रु. ते ५००० रुपयांपर्यंत उच्चांकी दर मिळाले होते.

अंतिम बिलापोटी शाहू कागल, सदाशिव मंडलिक हमीदवाडा, हुतात्मा वाळवा, राजाराम बापू साखराळे, सर्वोदय कारंदवाडी या सर्व कारखान्यांनी २७०० रुपयांच्यावर अंतिम दर दिला आहे. मग दत्त शिरोळ, वारणा, शरद नरंदे, कुंभी-कासारी, भोगावती, गणपति जिल्हा संघ, तासगाव, सोनहिरा, केन ॲग्रो कडेगाव इत्यादी कारखान्यांना हा दर का देता येत नाही? शेतकऱ्यांनी यावेळी जोरदार घोषणांनी कार्यालय दणाणून सोडले. शाहू कागलची रिकव्हरी १२.११ आहे तर दत्त शिरोळची १२.३७ असताना फक्त २३११ रुपयांचे प्रस्ताव आपण मान्य कसे करता? हे प्रस्ताव आम्हाला मान्य नसल्याचे कोले यांनी सांगितले. कटरे यांनी लेखी तक्रार द्या मी पुणे आयुक्तांना पाठवतो असे सांगितले.

वसंतदादा सांगली, महाकाली कवेठे महाकाळ, पंचगंगा इचलकरंजी, या कारखान्यांनी हंगाम संपला तरीही अनेक शेतकऱ्यांना पहिला ॲडव्हान्स 'एक रुपया'ही दिला नाही. १४ दिवसांत पहिली उचल देणे बंधनकारक आहे. आपले कार्यालय कोणतेही काम करत नाही, ही बाब निदर्शनास आणून दिली. यावर कटरे यांनी संबंधित कारखान्यांना नोटीस दिले आहे. असे सांगताच जिल्हाप्रमुख शीतल राजोबा यांनी आपले कार्यालय काही कामाचे राहिलेले नाही, हे कॅगने आपल्या अहवालात सांगितले आहे. त्यामुळे असली फसवी उत्तरे देऊ नका, पैसे वेळेत मिळवून देण्याची जबाबदारी तुमची आहे. ते जमत नसेल तर कार्यालयास कुलूप लावतो. सरकारचा पैसा आपल्या पगारांवर खर्च होतो तो वाचेल. कारखानदारांच्या चोरीला कायदेशीर बळ देण्याचे काम साखर विभाग करत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी खते, बियाणे, औषधे, कर्जफेड, मजुरी, वीजबिले, मुलांचे शिक्षण, प्रापंचिक खर्च कसा करावा असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे अंतिम बिले त्वरीत मिळावीत अशी जोरदार मागणी करण्यात आली. संघटना कार्यकर्त्यांची आक्रमता पाहून कटरे यांनी वसंतदादा, महाकाली कारखानदारांच्या संबंधित अधिकाऱ्यांशी फोनवरून चर्चा केली. कोणत्याही परिस्थितीत आठ दिवसांत बिले दिली जातील असे आश्वासन दिले. यावेळी शेतकऱ्यांनी घोषणांनी कार्यालयाचे आवार दणाणून सोडले.

यावेळी स्व.भा.प. जिल्हाप्रमुख एम. के. माळी, नाना पाटील ब्रिगेडचे जिल्हाप्रमुख अल्लाउद्दीन जमादार, स्वभाप युवा आघाडी जिल्हाप्रमुख रामचंद्र कणसे, पश्चिम महाराष्ट्र महिला आघाडी प्रमुख उज्ज्वलाताई नरदे, सरचिटणीस चंद्रकांत वंजाळे, स्वभाप मिरज ता. प्रमुख रावसो दळवी, शे.सं. माजी जिल्हाप्रमुख तानाजी चव्हाण इ. पदाधिकारी व शीतल राजोबा, वृषभ पाटील, एकनाथ कापसे, शरद चव्हाण, बाबा पाटणे, अण्णासो करुणे आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## निंभोरे येथे वीज वितरण कार्यालयास शेतकरी संघटनेचा 'घेराव'

**करमाळा :** निंभोरे येथे थकीत वीज बिलासाठी शेतीपंपाचा वीजपुरवठा खंडीत केल्यामुळे शेतकरी संघटनेच्या वतीने परमेश्वर तळेकर यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (ता. २९) दुपारी १२ ते ३ या वेळेत वीज वितरण कंपनीच्या कार्यालयास घेराव घालून आंदोलन करण्यात आले. थकीत वीज बिलामुळे निंभोरे येथील शेतीपंपाचा वीजपुरवठा खंडीत केला होता. त्यामुळे शेतकरी त्रस्त झाले होते. याबाबत शेतकरी संघटनेची २७ जूनला ग्रामपंचायत कार्यालयासमोर सभा झाली. त्यानंतर संघटनेच्यावतीने जेऊन वीज वितरण कंपनीच्या कार्यालयास चोवीस तासांच्या आत वीजपुरवठा पूर्ववत सुरू करण्याबाबत निवेदन देण्यात आले. याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे संघटनेने वीज वितरण कंपनीच्या कार्यालयास घेराव घालून आंदोलन केले. या आंदोलनाची दखल घेऊन कंपनीने निंभोरे येथील शेतीपंपाचा संपूर्ण वीजपुरवठा पूर्ववत सुरू केला. या आंदोलनात अण्णा वळेकर, राजू दळवे, तात्या वळेकर, अरुण वळेकर, संजय फरतडे, दत्तात्रय वरकड, देविदास नलावडे, किसन वाघमारे आदी सहभागी झाले होते.

## सिंदखेड से.स.सो. गेवराईवर शेतकरी संघटनेचा झेंडा

**गेवराई : बीड**

गेवराई येथील सिंदखेड सेवा सह. सोसायटीवर शेतकरी संघटनेचे सदस्य बहुमताने निवडून आले. निवडून आलेल्या सदस्यांमध्ये श्रीमती शांताबाई भिकू कराडे (चेअरमन), आबासाहेब चित्रभूज ठोसर (व्हा. चेअरमन), भारत शंकर कराडे (सदस्य), नारायण आसराजी शिंदे (सदस्य), संदीपान किशनराव ठोसर (सदस्य) यांचा समावेश आहे.

निवडून आलेल्या कार्यकर्त्यांचे स्व.भा.प. अध्यक्ष माजी आमदार वामनराव चटप, ॲड. रामराव नाटकर, ॲड. बाबासाहेब चोरमले, डॉ. रघुनाथ पावडे यांनी अभिनंदन केले.

# स्वाहाकारी सहकारावर परिसंवाद

**विषय : कॅगने केलेल्या सहकारी साखर कारखान्यांच्या ऑडीटमधून दिसलेल्या भ्रष्टाचारावरती चर्चा**

■

प्रमुख वक्ते

**अशोक कुलकर्णी**

**वामनराव चटप** (अध्यक्ष स्व.भा.प.)

**रवि देवांग** (अध्यक्ष शे. सं)

■

निमंत्रक

**संजय कोले** (अध्यक्ष - शेतकरी संघटना युवा आघाडी)

**अनिल घनवट** (माजी अध्यक्ष - शेतकरी संघटना युवा आघाडी)

■

संपर्क

**शीतल राजोबा मो. ९४२११२२५६७१**

■

**बुधवार दि. २४ ऑगस्ट २०११ दुपारी २.०० वाजता**

**स्थळ : मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, पटेल चौक, सांगली.**

*सहकारी भस्मासूरापासून शेतकऱ्यांना कोण वाचवणार?*